शनिवार, 03 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 36
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी




MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 03 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-36 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5




नाशिकमध्ये मागील तीन महिन्यांपासून सतत चर्चेत असलेल्या महाराष्ट्रातील राजकारणासंबंधी आकर्षक देखावा साकारला आहे. महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष चांगलाच गाजत होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी शिवसेनेशी बंडखोरी करत भाजपसोबत सत्ता स्थापन केली. याचा देखावा साकारण्यात आला आहे.

# नवा ध्वज छत्रपती शिवरायांना समर्पित

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**कोची : भारतीय नौदलाच्या झेंड्यावर आतापर्यंत गुलागिरीचे निशाण होते. पण आज २ सप्टेंबर २०२२ या ऐतिहासिक तारखेला इतिहास बदलून टाकणारे काम आपण केले. आज भारताने गुलामगिरीचे ओझे झेंड्यावरुन पुसून टाकले. आजपासून भारतीय नौदलाला नवा झेंडा मिळाला आहे. तो झेंडा आपण नौदलाचे प्रणेते छत्रपती शिवरायांना समर्पित करतो आहोत, अशी मोठी घोषणा करतानाच नौदलाचा नवा झेंडा आता समुद्रात आणि आकाशात डौलाने फडकेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.**

देशाची पहिली विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत भारतीय नौदलाच्या लढाऊ ताफ्यात सामील झाली आहे. केरळमधील कोची येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी केलेल्या भाषणात आयएनएस विक्रांत युद्धनौकेचे महत्त्व पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आज भारत जगातील त्या देशांमध्ये सामील झाला आहे, जे देश स्वदेशी तंत्रज्ञानाने एवढी मोठी विमानवाहू युद्धनौका तयार करतात. आज आयएनएस विक्रांतने देशाला नवा आत्मविश्वास दिला आहे. आयएनएस विक्रांतच्या प्रत्येक भागाचे वैशिष्ट्य आहेत, एक ताकद आहे, स्वतःचा विकास प्रवास आहे. आयएनएस विक्रांत म्हणजे स्वदेशी क्षमता, स्वदेशी संसाधने आणि स्वदेशी कौशल्यांचे प्रतीक आहे. त्याच्या एअरबेसमध्ये बसवलेले स्टीलही स्वदेशी आहे.

**विक्रांत विशाल-विराट- विहंगम**

विक्रांत विशाल आहे, विराट आहे, विहंगम आहे.. विक्रांत विशिष्ट आहे, विक्रांत खासही आहे. विक्रांत ही केवळ युद्धनौका नाही. २१ व्या शतकातील भारताच्या कठोर परिश्रम, प्रतिभा, प्रभाव आणि वचनबद्धतेचा हा पुरावा आहे.

**सेंट जॉर्जेस क्रॉस हटवले, आता झेंड्यावर तिरंगा आणि बोधचिन्ह**

आधीच्या ध्वजावर पूर्वीच्या दोन लाल रेषा होत्या. त्या लाल रेषा आता काढून टाकण्यात आल्या आहेत.



त्यांना सेंट जॉर्जेस क्रॉस म्हटले जायचे. ज्या ब्रिटिशांच्या राजवटीपासून तशाच राहिल्याचे सांगितले जाते. आता मात्र नव्या झेंड्यावर एका बाजूला भारताचा तिरंगा दिसणार आहे, तर त्याच्या बाजूला नौदलाचे बोधचिन्ह दिसणार आहे.

**'विक्रांत'वर महिलांनाही स्थान**

जेव्हा विक्रांत देशाच्या सागरी क्षेत्राच्या रक्षणासाठी उतरेल तेव्हा नौदलाच्या अनेक महिला सैनिकही जहाजावर तैनात असतील. महासागराच्या अफाट शक्तीने, अमर्याद स्त्री शक्तीने ती नव्या भारताची उदात्त ओळख बनत आहे. आता भारतीय नौदलाने महिलांसाठी आपल्या सर्व शाखा उघडण्याचा निर्णय घेतला आहे. जे निर्बंध होते ते आता हटवले जात आहेत. ज्याप्रमाणे समर्थ लहरींना सीमा नसतात, त्याचप्रमाणे भारतातील महिलांनाही आता कोणत्याही सीमा किंवा बंधने नाहीत. थेंब थेंब पाण्याने अथांग महासागर बनतो. त्याचप्रमाणे भारतातील प्रत्येक नागरिकाने 'वोकल फॉर लोकल' हा मंत्र जगायला सुरुवात केली तर देश स्वावलंबी व्हायला फारसा वेळ लागणार नाही, असे मोदी म्हणाले.

### नौदलाचा नवा झेंडा समुद्रात आणि आकाशात फडकणार

छत्रपती शिवाजी महाराजांच नौदलातील योगदान अधोरेखित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, सागरी शक्तीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी असे नौदल उभारले, ज्याने शत्रूंची झोप उडवली. इंग्रज भारतात आले तेव्हा त्यांना भारतीय जहाजांची ताकद आणि त्याद्वारे होणाऱ्या व्यापाराच्या ताकदीचा धाक होता. आतापर्यंत भारतीय नौदलाच्या ध्वजावर गुलामगिरीची ओळख होती. मात्र आता छत्रपती शिवरायांच्या प्रेरणेने आजपासून नौदलाचा नवा झेंडा समुद्रात आणि आकाशात फडकणार आहे. भारतीय नौदलाच्या झेंड्यावर आतापर्यंत गुलागिरीचं निशाण होते. पण आज २ सप्टेंबर २०२२ या ऐतिहासिक तारखेला इतिहास बदलून टाकणारे काम आपण केले. आज भारताने गुलामगिरीचे ओझे झेंड्यावरुन पुसून टाकले. आजपासून भारतीय नौदलाला नवा झेंडा मिळाला आहे.

# तिस्ता सेटलवाड यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गुजरात दंगलीनंतर सरकारविरोधात कट रचल्याच्या आरोपांखाली सामाजिक कार्यकर्त्या तीस्ता सेटलवाड यांना मुंबईतून अटक करण्यात आली होती. त्यानंतर मागील दोन महिन्यांपासून त्या अटकेत आहे. त्यात आता सर्वोच्च न्यायालयाने तीस्ता सेटलवाड यांना मोठा दिलासा दिला आहे. तीस्ता सेटलवाड यांना अंतरित जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यू. यू. लळित, न्यायामूर्ती एस. रवींद्र भट आणि न्यायमूर्ती सुधांशू भट यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. गुजरात दंगलप्रकरणी खोटी कागदपत्रे तयार करुन अनेकांना त्यामध्ये गोवण्याचा प्रयत्न केला, असा आरोप सेटलवाड यांच्यावर ठेवण्यात आला होता. त्याप्रकरणी २५ जूनपासून सेटलवाड अटकेत होत्या. त्यांनी जामीनासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने ३ ऑगस्टला असलेलली सुनावणी सहा आठवड्यांसाठी पुढे ढकलली होती. त्याविरोधात सेटलवाड यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलेली. अखेर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर करत दिलासा दिला आहे.

**दोन महिन्यांपासून कोठडीत का ठेवले?**

दरम्यान, गुरुवारी तीस्ता सेटलवाड यांच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली होती. तेव्हा जामीनासाठी दाखल केलेल्या याचिकांची सुनावणी सहा आठवडे पुढे का ढकलली? सामान्य स्वरूपाचा गुन्हा असलेल्या अशा प्रकरणांत एका महिला आरोपीविरोधात सुनावणीला एवढा विलंब का, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला होता. तसेच, तीस्ता सेटलवाड यांच्याविरोधात पोटा अथवा यूएपीएच्या अंतर्गत गुन्हा दाखल केलेला नाही. मग दोन महिन्यांपासून त्यांना कोठडीत का ठेवले, असा प्रश्नही सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला विचारला होता.



# रविंद्र जडेजा आशिया कपमधून बाहेर

आधुनिक केसरी न्यूज

**दुबई :** आशिया कप २०२२मध्ये दमदार सुरूवात करणाऱ्या भारतीय क्रिकेट संघासाठी गुरुवारी एक धक्कादायक बातमी आली. गेल्या दोन सामन्यात संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका पार पाडणारा रविंद्र जडेजा आशिया कपमधून बाहेर झाला आहे.

जडेजाने पाकिस्तानविरुद्ध चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येत विजयात महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. जडेजाने पाकविरुद्ध ३५ धावा केल्या होत्या. अखेरच्या षटकात तो बाद झाला. त्यानंतर हाँगकाँगविरुद्ध गोलंदाजीत ४ षटकात फक्त १५ धावा दिल्या आणि एक अफलातून थ्रो करत कर्णधाराला धावबाद केले होते.

ग्रुप फेरीतील दोन विजयांसह भारताने सुपर-४ मध्ये प्रवेश केला. रविवारी भारतीय पुढील मॅच असून ती कदाचित पाकिस्तानविरुद्ध होण्याची शक्यता आहे. अशात जडेजा संघाबाहेर झाल्याने रोहित शर्मा आणि कंपनीसाठी मोठा धक्का मानला जात आहे. बीसीसीआयने जडेजाच्या दुखापतीची माहिती देतानाच त्याच्या जागी संघात अक्षर पटेलची निवड केल्याचे जाहीर केले आहे. आशिया कपसाठी संघाची घोषणा झाली होती तेव्हा अक्षर पटेलला स्टॅंडबाय म्हणून ठेवण्यात आले होते. जडेजा प्रमाणे तो फलंदाजी आणि गोलंदाजी देखील करू शकतो. वेस्ट इंडिज दौऱ्यात फलंदाजी द्वारे त्याने विजय मिळून दिला होता. ज्या सामन्यात भारताचा पराभव होईल असे वाटत होते तेव्हा अक्षरने ३५ चेंडूत ६४ धावा केल्या होत्या आणि विजय मिळून दिला.

**असा आहे भारतीय संघ-** रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, दीपक हुड्डा, ऋषभ पंत, दिनेश कार्तिक, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, आर अश्विन, युजवेंद्र चहल, रवी बिश्नोई, भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंग, आवेश खान.

# जयराम रमेश यांचा आझाद यांच्यावर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी नुकताच पक्ष सोडलेल्या गुलाम नबी आझाद यांच्यावर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. नवी दिल्लीत मोदी सरकारने मंजूर केलेल्या बंगल्यांमध्ये बसलेले लोक जे सांगत आहेत, त्यापेक्षा जम्मू-काश्मीरमधील काँग्रेसची ग्राउंड लेवलवरील स्थिती वेगळी असल्याचा दावा जयराम यांनी शुक्रवारी केला.

जयराम रमेश यांनी ट्विटमध्ये जम्मू आणि काश्मीर काँग्रेसने जारी केलेला एक व्हिडिओ पोस्ट केला. या ट्विटमध्ये लिहिले की, जम्मू आणि काश्मीरची वास्तविकता ही मोदी सरकारच्या मोठमोठ्या बंगल्यांमध्ये बसलेल्या लोकांनी बनवलेल्या खोट्या बातम्या नाहीत. वास्तविकता आहे. जम्मू-काश्मीर काँग्रेसच्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, भालेसाच्या सर्व ब्लॉकमधील काँग्रेस कार्यकर्त्यांनी 1 सप्टेंबर रोजी गंडोह पक्ष कार्यालयात मासिक बैठक घेतली. गेल्या 50 वर्षांपासून या बैठका होत आहेत. भालेसा हे काँग्रेसचे माजी नेते गुलाम नबी आझाद यांचे मूळ गाव आहे.

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन

## अरविंद केजरीवाल यांची गुजरातमध्ये मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज


**अहमदाबाद :** गुजरातमध्ये यावर्षी निवडणुका होणार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची तयारी सुरू आहे. राज्यात ठिकठिकाणी राजकीय भेटीगाठी सुरू आहेत. यासोबतच नेत्यांचे दौरेही सुरू आहेत. आम आदमी पक्षाचे नेते नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी राज्यातील द्वारका शहरात एका सभेला संबोधित केले. या मेळाव्याला संबोधित करताना केजरीवाल यांनी मोठमोठी आश्वसने दिली.

केजरीवाल म्हणाले की, निवडणुका आल्या आहेत. हे भाजपचे लोक मला शिव्या देतील, गोपाळला देतील, इशुदांना देतील, पण शिव्या देऊन काय होणार? देशाची प्रगती होणार नाही. आम्ही देशाला नंबर 1 करण्यासाठी आलो आहोत.

केजरीवाल पुढं म्हणाले की, मी राजकारण करण्यासाठी आलो नाही. देशाला नंबर-1 बनवायचं आहे. मी कामाची हमी देत आहे. मी आश्वासन पूर्ण केले नाही, तर पुढच्या



वेळी मतदान करू नका. प्रत्येक तरुणाची व्यवस्था करू आणि 10 लाख सरकारी नोकऱ्या तयार करू. मात्र जोपर्यंत नोकरी देणार नाही, तोपर्यंत 3 हजार रुपये बेरोजगारी भत्ता दिला जाईल. जाहीर सभेत मोफत वीज देण्याची घोषणा करताना केजरीवाल म्हणाले, दिल्लीत लोकांना 24 तास वीज मिळते, तीही मोफत. ही जादू फक्त केजरीवालांनाच येते. इतर कोणालाच माहीत नाही. गुजरातमध्ये सरकार बनवा, ३ महिन्यांनंतर तुमचे वीजबिल शून्यावर येईल. तसेच आम्ही सर्व जुनी बिले माफ करू आणि 300 युनिट मोफत देऊ.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# गणेशोत्सवाच्या निमित्ताने...

आधुनिक केसरी

आणि मांगल्याची सुरुवात होते. ती गणेशाच्या रूपाने झाली. तो तिचा रक्षणकर्ता बनला.
नंतर आपण ऐकले आहे की भगवान शंकर जेव्हा पार्वतीला भेटण्यास आले तेव्हा द्वारपाल या नात्याने गणपतीने त्यांना अडवले. त्यांच्यात युद्ध झाले आणि शेवटी शंकरांनी श्रीगणेशाचे मस्तक उडविले. ही कथा सुद्धा प्रतिकात्मक आहे. गणपती हा मुळात रूपवान आणि सामर्थ्यवान होता. त्याला आपल्या रूपाचा आणि शक्तीचा अहंकार झाला होता. त्यामुळे त्याचा अहंकार नाहीसा करण्यासाठी शंकरांनी त्याचा शिरच्छेद केला. म्हणजे अहंकार नाहीसा केला. अहंकार हा प्रगतीतली मोठी बाधा आहे. अहंकारामुळे थोर लोकांचे सुद्धा



अधःपतन झालेले आपण पाहतो. नंतर गणपतीला हत्तीचे शीर बसवण्यात आले म्हणून तो गजमुख झाला. गजानन झाला. हे ही प्रतिकात्मक आहे. हत्ती हा राजसत्तेचे प्रतिक आहे. ऐश्वर्याचे प्रतिक आहे. हत्तीचे मोठे डोके हे बुद्धिमत्तेचे प्रतिक आहे. श्रीगणेश ही बुद्धीची देवता आहे. म्हणून गणपती राजसत्ता, ऐश्वर्य आणि बुद्धिमत्तेचे प्रतिनिधित्व करतो. गणपती हा एकदंत का आहे या संबंधीही अनेक पौराणिक कथा आहेत. पण त्याचा खंडित दंत हा विविध मतांचे खंडन करून योग्य निष्कर्षाप्रत पोहचण्याचे प्रतिक आहे. तसेच तो संकटांचे खंडन म्हणजे अंत करणारा आहे. गणपतीच्या हातात मोदक आहे. हा मोदक आरोग्यदायी तर आहेच. पण प्रतिकात्मक सुद्धा आहे. मोद म्हणजे आनंद. क म्हणजे कर्ता. किंवा कर्म असाही अर्थ घेता येतो. गणपती हा मोद देणारा म्हणजे आनंद देणारा आहे. कर्माच्या सारणामध्ये आनंदरुपी पाच पाकळ्या अशी यामागील कल्पना आहे. म्हणून मोदक पाच पाकळ्यांचा बनवतात. या पाच कळ्या म्हणजे ज्ञानाची पाच साधने. अभ्यास, मनन, चिंतन, अवलोकन आणि आकलन. हे सारे मिळून कर्माच्या सारणामधून जो आनंद मिळतो तो मोदक. गणपतीचे सुपासारखे मोठे कान सांगतात की भरपूर ऐका. श्रवणाद्वारे ज्ञान ग्रहण करा. उत्तम श्रोते व्हा. लहान मोठ्या गोष्टी कानात साठवा. त्याचे बारीक असलेले डोळे सांगतात की कुठल्याही गोष्टीचे नीट बारकाईने निरीक्षण करा. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## आजचा दिवस माझा हेच सत्य

आधुनिक केसरी

कालचा दिवस संपल्यावरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच; पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. सद्यःस्थितीत जगामध्ये पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो. "आजचा दिवस माझा" हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केले पाहिजे. आपल्याला आपण स्वतः प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे; पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वतःला सिद्ध करण्याची जरुरी असते, हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वतःला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आले पाहिजे, आपण ध्यानांत घेतले पाहिजे.
कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेले अथवा आपण ठरवलेले नसते. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असे नाही; तर काही घटना मात्र अनावधानाने, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात. खरेच, ह्या मनाचे नेमके काय रसायन आहे, आपल्याला काही कळत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## पुण्यवान धर्म | वैष्णवांचा ||

कुणाशी नसावा | वैर दुजाभाव ||
आपुला तो गाव | परलोकी ||१||

चार पाच दिन | मुक्काम येथला ||
कलंक कशाला | माथी घेतो ||२||

नांदण्या सासरी | धाडीले आम्हास ||
आनंदे निवास | बांधू येथे ||३||

नाव त्याचे घेऊ | गावूनी अभंग ||
संसार अथांग | तरावया ||४||

काया वाचा मने | घडावे सत्कर्म ||
पुण्यवान धर्म | वैष्णवांचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

**नमोऽस्तु नालीकनिभाननायै**
**नमोऽस्तु दुग्धोदधिजन्मभूत्यै ।**
**नमोऽस्तु सोमामृतसोदरायै**
**नमोऽस्तु नारायणवल्लभायै ॥१२॥**

कमलवदना कमलेला नमस्कार आहे.
क्षीरसिंधुसंभूता श्रीदेवीला नमस्कार आहे.
चंद्रमा आणि सुधा यांच्या सख्ख्या बहिणीला नमस्कार आहे. भगवान नारायणाच्या वल्लभेला नमस्कार आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# चढलेला मोठा आवाज...

आधुनिक केसरी

आपल्याला वडीलधारी माणसे सांगत आली आहेत की, घरामध्ये चढ्या आवाजात बोलू नये. विषारी लहरी पसरतात. मृदू स्वरात संवाद करावा. कितीही संताप आला तरी मनावरचे नियंत्रण आणि आवाजाचा आवेग शांत ठेवावा. घरात हसतमुखाने वावरावे. मुलांना खूप प्रेम देऊन त्यांना आपलेसे करावे. घरांतील नोकरवर्गावरही तारस्वरात ओरडू नये कारण त्यांना राग येतो व त्यांच्या दुखावलेल्या मनातल्या ऋण लहरी अशुभ अनुभव देऊ लागतात. अचानक पोट बिघडते. भूक मंदावते. अस्वस्थ वाटू लागते. म्हणून कोणालाच चढ्या आवाजात रागावणे किंवा शिव्या देणे हे अदृष्य लहरींची शिकार होण्याची वेळ आणते. काही क्षण प्रतिक्रिया देऊ नये मग गवत नसलेल्या जागी पडलेला अग्नि जसा आपोआप शांत होतो तसा आपलाही राग आवरला जातो.
शुभ लहरींचे ही तसेच आहे. १२ हजार मैलांवर असलेल्या मुलाला आई आशिर्वाद देते आणि त्याला प्रसन्न वाटू लागते. २५ वर्षांच्या कर्णाला पाहून कुंतीचे उत्तरीय ओले होते. वासराला पाहून गायीला पान्हा फुटतो. एखाद्या गरजू याचकाला आपण मदत केली तर त्याला होणाऱ्या आनंददायी लहरी आपला उत्साह वाढवितात. एखाद्या सफाई कामगाराला बक्षिस दिले तर तो हात उंचावून आशिर्वाद देणार नाही, थँक यु म्हणणार नाही पण त्याच्या मनातून निघणाऱ्या आनंद लहरींमुळे तुमच्या शरीरा भोवती एक विशिष्ट चुंबकीय तरंग तयार होऊन तुम्हाला आगळावेगळा उत्साह वाटेलच. म्हणून दानधर्माचे अपार महात्म्य आहे. फक्त मनुष्य योनीला बोलण्याची देणगी देवाने दिली आहे. ती दाहक बोलण्याने अपमानित होते. म्हणून संवाद साधतांना, मंत्रपठण करतांना, स्तोत्रे म्हणतांना, आरती करतांना, पोथी वाचतांना, आपला स्वर कमालीचा मृदू असावा. भले तुम्ही मग कितीही बैठक, सत्संग करा पण बोलण्यावर आणि स्वभावावर ताबा नसेल तर त्याचा काहीच उपयोग नाही. तुमच्या आरडा ओरडा करणाऱ्या स्वभावाने कोणीच आदर करत नाही. शक्य असेल तेवढे शांतपणे बोला, शांतपणे वागा तरच तुम्ही केलेल्या अध्यात्माचा फायदा होईल नाही तर सगळं व्यर्थ आणि देखावा आहे.

# श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र !



आधुनिक केसरी न्यूज

मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारित होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्याच्या दोन तारा असल्या, तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूर्तीखालील तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशा तऱ्हेने शक्तीने भारित झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात.
श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती घरी कशी आणावी ? : श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. मूर्ती हातात घेणाऱ्याने हिंदू वेशभूषा करावी, म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. त्याने डोक्यावर टोपीही घालावी. मूर्ती आणतांना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणतांना मूर्तीचे मुख आणणाऱ्याकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व, तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते. मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो. तो सगुणातील कार्याचे प्रतीक आहे. मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो, तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. श्री गणेशाचा जयजयकार आणि भावपूर्ण नामजप करत मूर्ती घरी आणावी. घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. घरातील सुवासिनीने मूर्ती आणणाऱ्याच्या पायांवर दूध आणि नंतर पाणी घालावे. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूर्तीचे औक्षण करून ती घरात आणावी. सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रूमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी. मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करतांना स्वतःचे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही, अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल. दक्षिण दिशेला मूर्तीचे तोंड असू नये. दक्षिणेकडे तोंड साधारणपणे उग्र देवतांचे असते, उदा. काली, हनुमान, नरसिंह इत्यादी. गणपतीची जी मूर्ती आपण आणतो, ती उग्र नसून प्रसन्न किंवा शांत असते; म्हणूनच शक्यतो तिला दक्षिणमुखी ठेवू नये.
मध्यपूजाविधी : गणपति घरी असेपर्यंत प्रतिदिन सकाळी आणि संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा सोडून गणपतीची नेहमी पूजा करतो तशी पूजा करावी आणि शेवटी आरत्या आणि मंत्रपुष्प म्हणावे. गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रतिदिन करावयाची पंचोपचार पूजा करावी.
उत्तरपूजा : गणपतीच्या विसर्जनापूर्वी ही पूजा करायची असते. विशिष्ट मंत्र म्हणून पुढे दिल्याप्रमाणे पूजा करावी - 1. आचमन, 2. संकल्प, 3. चंदनार्पण, 4. अक्षतार्पण, 5. पुष्पार्पण, 6. हरिद्रा (हळद)-कुंकूमार्पण, 7. दूर्वार्पण, 8. धूप-दीप दर्शन आणि 9. नैवेद्य. यानंतर आरती करून मंत्रपुष्पांजली समर्पावी. सर्वांनी गणपतीच्या हातावर अक्षता द्याव्या आणि मूर्ती उजव्या हाताने हालवावी.
विसर्जन : उत्तरपूजेनंतर मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात. विसर्जनाला जातांना गणपतीबरोबर दही, पोहे, नारळ, मोदक वगैरे शिदोरी द्यावी. जलाशयाजवळ पुन्हा आरती करावी आणि मूर्ती शिदोरीसह पाण्यात सोडून द्यावी.
संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपति'

दत्तात्रेय वाघूळदे
संपर्क क्र. 9284027180

# बंडखोरांना निवडणुकीत पळता भुई थोडी होईल : चंद्रकांत खैरे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आता पन्नास खोके घेऊन मजा करणाऱ्या शिवसेनेच्या बंडखोर आमदारांना आगामी निवडणुकांमध्ये पळताभूई थोडी होईल, जनता या बंडखोरांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. फुटलेले आमदार उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबाबतीत काहीही बोलत आहेत. तुम्ही एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले आहात तर शांत बसा, त्यांची तळी उचला आम्हाला काही म्हणणे नाही. मात्र, अशा पद्धतीने वक्तव्य केले तर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा शिवसेना नेते चंद्रकांत खैरेंनी बंडखोर आमदारांना दिला आहे. तर न्यायालयाचा निकाल उद्धव ठाकरे यांच्याकडून लागू द्यावा, यासाठी आपण देवाला साकड घालत असल्याचे खैरे यांनी सांगितले. ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात शुक्रवारी त्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. या वेळी त्यांनी पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.



शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना फुटलेले आमदार उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबाबतीत काहीही बोलत आहेत. नेत्यांना उलट बोलला तर सहन केले जाणार नाही. आता तुम्ही एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले आहात तर शांत बसा, त्यांची तळी उचला आम्हाला काही म्हणणे नाही. मात्र, अशा पद्धतीने वक्तव्य केले तर परिणाम भोगावे लागतील. तुम्ही शिक्षण सम्राट आहात म्हणून काय झाले. तुम्हालाही एक दिवस ईडी मागे लागेल. अशा कृत्यांमुळे शिवसैनिकांना राग येणारच, ते सोडणार नाही तुम्हाला, असा इशारा खैरे यांनी शिंदे गटातील आमदारांना दिला.

उच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीची पूर्ण माहिती रोज घेत असून, त्याबाबत कायदे तज्ञांशी रोज चर्चा देखील केली जाते. कपिल सिब्बल आणि इतर वकील उद्धव ठाकरे यांची चांगली बाजू मांडत आहे. त्यामुळे आपण देवाकडे प्रार्थना करत आहे. दक्षिणमुखी मारुती आणि जगदंबे जवळ आपण प्रार्थना करून साकडे घालत आहे. खरी शिवसेना कोणती आहे हे लवकरच समोर येईल. आदित्य ठाकरे यांच्या सभांना आता मोठी गर्दी होत आहे. देश विदेशातून उद्धव ठाकरे यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून, शिवसेनाच जिंकेल, असे मत शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी व्यक्त केले.

यावेळी राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, ज्ञानेश्वर तांबे पाटील, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, डॉ. गणेश वाघ, सतिश पाटील, अनिल कुलथे आदींची उपस्थिती होती.

### आजच्या आरतीचे मान्यवर



**श्री गणेशाची शनिवार दि. ३ रोजीची सायंकाळची आरती छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी संजय पाटील यांच्या हस्ते होणार आहे, तरी पत्रकार बांधवांनी या आरतीच्या पावनप्रसंगी उपस्थित राहावे, अशी विनंती संघाच्या वतीने करण्यात आली आहे.**



# पालखी महामार्गाचे पाणी शेतात शिरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** शेगाव-पंढरपूर पालखी महामार्गाचे काम लोणार मेहकर हद्दीत सन २०१७ पासून कासवगतीने सुरू आहे. आज २०२२ संपायला आला. तरीही काम अपूर्ण दिसत आहे. या पालखी महामार्गाचे काम १८ महिन्यांमध्ये पूर्ण करावयाचे होते असे समजते. परंतु हे भिजत घोंगडे अजून किती दिवस चालेल हे सांगता येणार नाही. या महामार्गाचे काम पूर्ण होणे अगोदरच झालेल्या रस्त्यांला तडे जात आहे. आणी रस्त्याच्या नाल्या उतार (लेव्हल) व्यवस्थित घेतली नसल्याने दोन वर्षापासून रस्त्याचे पाणी शेतकर्याच्या शेतात जाऊन पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. तक्रार करूनही याकडे रस्ते विकास महामंडळ दुर्लक्ष करीत आहेत.

लोणार-मेहकर महामार्गावर जागो-जागी तडे गेले दिसत आहे. या महामार्गाच्या कामाची गुणवत्ता ढसाळलेली दिसत आहे. याकडे कोणी लक्ष देण्यास तयार नाही. या महामार्गाच्या बाजूला लोकांची शेती आहे. पूर्वीला शेती आणि रस्ते समांतर होते. परंतु आता पालखी महामार्गाचे काम सुरू झाले. तेव्हापासून रस्ते हे शेतापासून उंच झाले. नाल्यांचे काम व्यवस्थित झाले नाही. तेव्हापासून शेतकऱ्यांच्या शेतामध्ये दोन वर्षापासून पाणी जात असल्यामुळे शेतात तलाव निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे पूर्णता पिकाची नासाडी होत आहे. काही शेतकऱ्यांनी संबंधित विभागाला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकार्यांना व ज्या कंपनीने पालखी महामार्गाचे काम करण्यास घेतले. त्यांना शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या नोटीस दिल्या. तरीही त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा परिणाम होताना दिसत नाही. शेतकऱ्यांनी रस्ते विकास महामंडळाच्या कार्यालय मध्ये जाऊन तोंडी, लेखी, भ्रमणध्वनीवर तक्रारी दिल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी स्थळ निरीक्षण सुद्धा केले तरीही शेतकऱ्यांच्या शेतामधलं पाणी काढून देण्याचा प्रयत्न या लोकांनी केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे पिकाचे दोन वर्षापासून अतोनात नुकसान होत आहे. कोणाकडे न्याय मागावा हे सुद्धा कळत नाही. संबंधित विभागाचे अधिकारी आणि कंपनीचे अधिकारी उडवायडीचे उत्तर देत आहेत. शेतकरी हवालदिल झाला आहे. या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कोण देणार. काही ठिकाणी वहिवाटीचे रस्ते बंद झाल्याचे दिसत आहे.

शहरातील काम कासवगतीने

लोणार नगरी ही एक जगप्रसिद्ध 'अ' वर्ग दर्जा पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. शहराच्या हद्दीत रस्त्याच्या हद्दीपासून नालीपर्यंत पादचाऱ्यांसाठी अंदाजे ७ ते ८ फुट पर्यंत पेवर ब्लॉक बसवण्याचे काम करण्यासाठी खोदून ठेवले. रस्त्याच्या बाजूला खड्डे दिसत आहेत. परंतु अजूनपर्यंत त्या कामाला यांनी हात सुद्धा लावला नाही. तेही काम रेंगाळलेले आहे. यामुळे शहरातील व्यवसायिकांना आपल्या दुकानासमोर माती मुरू आणून टाकावा लागला. त्यामुळे पावसाळ्याचे दिवस असल्याने दुकानासमोर चिखल झालेला दिसत आहे. त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे शहर स्वच्छ सुंदर ही संकल्पना धुळीस मिळताना दिसत आहे. शासन विकास कामासाठी निधीची तरतुद करते परंतु निष्क्रिय अधिकारी आणि कामाची जाणीव नसलेले ठेकेदार यांच्यामुळे शासनावर जनतेचा रोष निर्माण होताना दिसत आहे.



# गंगापूर सोसायटी चेअरमनपदी सोपान देशमुख तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय दारुंटे यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सोपान देशमुख तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय दारुंटे यांची दि.२ शुक्रवार रोजी बिनविरोध निवड झाली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून गावंडे यांनी काम पाहिले. गंगापूर विविध कार्यकारी सोसायटी निवडणूक माजी नगराध्यक्ष संजय जाधव, मा आमदार कैलास पाटील यांचे नेतृत्वाखाली संपन्न झाली होती. या निवडणूक मध्ये शेतकरी विकास पॅनलचे बहुमताने विजयी झाले होते.

आज सहाय्यक कार्यकारी सोसायटी कार्यालय येथे बैठक घेऊन गंगापूर विविध कार्यकारी सोसायटी चेअरमनपदी सोपान देशमुख तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय दारुंटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चेअरमन सोपान देशमुख व व्हाईट चेअरमन दत्तात्रेय दारुंटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष संजय जाधव, समाजसेवक अमोल जगताप, साईनाथ दारुंटे, रावसाहेब तोगे, योगेश पाटील, सुरेश नेमाडे, राकेश कळसकर, तुकाराम सटाले, मोहसिन चाऊस, बदर जहुरी, खालेद नाहादी, फैसल चाऊस, लक्ष्मण लगड, डी.डी. पाटील, लक्ष्मण दारुंटे, मनोहर पाटील, गणेश लगड, अमोल वरकड, मनोज वरकड, नवनाथ कानाडे, बाबासाहेब लगड, शरद दारुंटे, आदींची मोठी उपस्थिती होती.

# मेहेरगाव येथील घटनेचा सत्यशोधक जन आंदोलकांकडून निषेध

## बहिष्कार टाकला तरी लोकप्रतिनिधी गप्प का? निषेधात्मक आंदोलनातून सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील मेहेरगाव येथे सण पोळ्याच्या दिवशी जातीयवादी मानसिकता असणाऱ्यांनी दलित तरुणांना अडवून बैल मिरवणुकीत नेऊ नये म्हणून लाठ्याकाठ्यानी मारहाण केली होती. तर एवढेच नव्हे तर दलित समाजावर बहिष्कार टाकण्याचा निंदनीय प्रकारचा निर्णयही जातीयवादी मानसिकता बाळगणाऱ्यांकडून घेण्यात आला. एकीकडे या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त होत आहे. दुसरीकडे एकही लोकप्रतिनिधी या घटनेची दखल घ्यायला तयार नाही त्या निषेधार्थ आज धुळे ते मेहरगाव अँटी कास्ट बायकर्स मार्च साठी हजारोंच्या संख्येने सत्यशोधक जन आंदोलनाच्या कार्यकर्त्यांसह आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ जमले होते मात्र पोलीस प्रशासनाने या आंदोलक कार्यकर्त्यांना अडवून त्यांना ताब्यात घेतल आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना दलितांवर सार्वजनिक बहिष्कार टाकून जातीवादी मानसिकता बाळगणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी ही प्रशासनाला यावेळी आंदोलकांनी केली आहे. तसेच मेहेरगाव या ठिकाणी दलित समाजावर बहिष्कार टाकला जातो मारहाण केली जाते तरी धुळे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी गप्प का? तुम्ही लोकप्रतिनिधी फक्त मोजक्यांचेच का? असा सवाल करत लोकप्रतिनिधींचा निषेधही यावेळी आंदोलकांनी केला आहे. सनदशी व लोकशाही मार्गाने सुरू असलेले आंदोलन पोलीस प्रशासनाकडून दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला आहे.

याप्रसंगी कॉम्रेड सिध्दार्थ जगदेव, सचिन बागुल, मनोज नगराळे, शरद वेंदे, राकेश अहिरे, सिध्दांत बागुल, जितेंद्र अहिरे, संदीप बोरसे, मनीष दामोदर, अतुल बैसाणे, अमोल शिरसाठ, मानसी पवार, निलीमा भामरे, नेहा बागुल यांच्यासह आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



# पोलीस आयुक्तालयात पेटवून घेतलेल्या महिलेचा आज पहाटे मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज दुपारी १ च्या सुमारास पोलीस आयुक्तालयात विवाहितेने जगण्याची इच्छा नसल्याचा अर्ज पोलीस देत स्वतःजवळ असलेले डिझेल अंगावर ओतून पेटवून घेतले. तिच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरु होते. ती ८० टक्के भाजल्याची माहिती डॉक्टरांनी पोलिसांना दिली. दरम्यान आज सकाळी साडेपाच ते सहाच्या दरम्यान सविता काळेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची नोंद बेगमपुरा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक प्रशांत पोतदार यांनी दिली.

सविता दीपक काळे (३२) रा. मांडवा ता. गंगापूर असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या विवाहितेची नाव आहे, दरम्यान रात्री ११ वा. सविताची प्रकृती आणखी खालावल्यामुळे आयसीयु मधुन सविता काळे हाला ट्रामामध्ये शिफ्ट केले होते तेथेही सविताने उपचारास प्रतिसाद न दिल्याने तिची प्राणज्योत मालवली. सविताच्या पतीचे शेजारील महिलेशी अनैतिक संबंध आहे या संशयावरून नवरा बायकोमध्ये गेल्या दहा वर्षांपासून नेहमीच भांडणे होत होती. नवरा तिचा शारीरिक व मानसिक छळ करत आहे अश्या तक्रारी तिने वाळूज पोलिसांना दिलेल्या आहेत. वाळूज पोलिसांनी सविताच्या तक्रारींची वेळोवेळी दाखल घेत कारवाई केली होती. वाळूज पोलीस निरीक्षक इंगोले यांनी तिच्या माहेरचे व दीपक काळे परिवारातील सदस्यांना बोलावून त्यांच्यासमोर तिचे समुपदेशन करत तिला नवऱ्याकडे राहण्यास तयार केले होते, अशी माहिती वरिष्ठ सुत्रांनी दिली. आज दुपारी सविताने तिचा पती व शेजारणीविरुध्द पोलीस आयुक्तालयात तक्रार दिली व पोलीस आयुक्तालयाच्या पायऱ्यांवर पेटवून घेतले. या प्रकरणानंतर सविताला घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# शिक्षकांच्या गुन्हेगारी प्रवृतीला पाठीशी घालण्याचे काम शिक्षक व पदवीधर आमदार करतात : आ.प्रशांत बंब

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भाजपाचे गंगापूर/खुलताबादचे आमदार प्रशांत बंब यांनी शुक्रवारी माहिती दिली की शिक्षक मतदार संघ व पदवीधर या मतदारसंघातून दोन आमदार निवडून येतात मात्र त्याचा मराठवाड्याला कोणत्याच प्रकारचा उपयोग होत नाही. शिक्षकांच्या समस्या अनेक वर्षांपासून असून मात्र हे आमदार त्यासाठी कोणत्याच प्रकारचा उपयोग शिक्षकांना आणि पदवीधर संघाला होत नाही उलटशिक्षकांच्या गुन्हेगारी प्रवृतीला पाठीशी घालण्याचे काम शिक्षक व पदवीधर आमदार करतात असाही आरोप आ.प्रशांत बंब यांनी पत्रकार परिषदेत केले आहे. त्यामुळे हे शिक्षक व पदवीधर आमदार का व कशासाठी निवडावा असा प्रश्न त्यांनी आज रोजी पत्रकार परिषदेत केला आहे.

# नागीण डान्स

आधुनिक केसरी

आशिय चषक स्पर्धेत बांगलादेशला नमवल्यानंतर श्रीलंकेचा अष्टपैलू क्रिकेटर चामिका करुणारत्ने याने नागीण डान्स केला होता. चामिकाच्या या डान्सने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. मात्र, हा नागीण डान्स नेमका कुठून आला? बांगलादेश आणि श्रीलंकेविरोधातील सामन्यात चामिकाने केलेल्या डान्सचा संदर्भ काय? या डान्सशी नझमुल इस्लाम अपू आणि डॅरेन सामी यांचा काय संबंध आहे? या डान्सचे मूळ २०१६ मध्ये झालेल्या एका क्रिकेट सामन्यामध्ये आहे. बांगलादेशचा डावखुरा फिरकीपटू नझमुल इस्लाम अपू 'बीपीएल' लीगच्या 'राजशाही किंग्ज' या संघाकडून खेळत होता. यादरम्यान नझमुलने हात उंचावून मोठ्या उत्साहात नागीण डान्स केला. कर्णधार डॅरेन सॅमीनेही नझमुलच्या आनंदात सहभागी होत नागीण डान्स केला. तेव्हापासून हा डान्स क्रिकेट जगतात प्रसिद्ध झाला. सामन्यादरम्यान जेव्हा मी हा डान्स करत होतो तेव्हा सुरवातीला सॅमीने घाबरण्याचे नाटक केले होते. हा डान्स खूप मजेदार आहे. २०१६ सालानंतर प्रत्येक सामन्यातील विजय साजरा करताना हा नागीण डान्स माझ्यासाठी ट्रेडमार्क बनला आहे, अशी प्रतिक्रिया यावर बोलताना नझमुलने २०१७ मध्ये दिली होती. त्यानंतर आशिया चषकात नुकत्याच झालेल्या बांगलादेश-श्रीलंका सामन्यातील विजयानंतर चामिका करुणारत्ने या डान्सवर थिरकताना दिसला. बांगलादेशचा डावखुरा फिरकीपटू नझमुल इस्लाम अपू 'बीपीएल' लीगमधील एक लोकप्रिय खेळाडू आहे. ड्रेसिंग रुममध्ये बिनधास्त अवतारात वावरणाऱ्या नझमुलचे आजवर अनेक व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. फेब्रुवारी २०१८ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात बांगलादेशकडून टी-२० संघात नझमुलने पदार्पण केले होते. या सामन्यात श्रीलंकेच्या चार खेळाडूंना बाद केल्यानंतर नझमुलने केलेला नागीण डान्स आजही क्रिकेटप्रेमींमध्ये प्रसिद्ध आहे. फेब्रुवारी २०१८ रोजी सिल्हेटमध्ये खेळल्या गेलेल्या टी-२० सामन्यादरम्यान बांगलादेशला डिवचण्यासाठी श्रीलंकेच्या खेळाडूंनी देखील नागीण डान्स केला होता. या सामन्यात गुनाथिलाकाने शेवटच्या षटकामध्ये दोन बळी घेत श्रीलंकेला विजय मिळवून दिला होता. अबू सईदला बाद केल्यानंतर नागीण डान्स करत गुनाथिलाकाने विजयाचा आनंद साजरा केला होता. १६ मार्च २०१८ रोजी खेळल्या गेलेल्या चुरशीच्या सामन्यानंतर बांगलादेश आणि श्रीलंका कट्टर प्रतिस्पर्धी बनले. या सामन्यादरम्यान दोन्ही संघातील खेळाडूंमध्ये शाब्दिक चकमक उडाली होती. उन्मादी आनंद साजरा करताना बांगलादेश संघाच्या ड्रेसिंग रुमचा दरवाजा तोडण्यात आला होता. या घटनेची पुढे चौकशी करण्यात आली. काही खेळाडूंना शिक्षेला देखील सामोरे जावे लागले होते. बांगलादेशला शेवटच्या पाच चेंडूत १२ धावा जिंकण्यासाठी आवश्यक असताना नुरुल हसन आणि श्रीलंकेच्या थिसारा परेरामध्ये शाब्दिक चकमक झाली होती. या सामन्यादरम्यान दोन्ही संघाच्या कर्णधारांची पंच लिंडन हनिबल यांच्याशीही वादावादी झाली होती. या सामन्यानंतर बांगलादेश आणि श्रीलंका एकमेकांचे कडवे प्रतिस्पर्धी बनले आहेत.



सौ. मिलिंदा पवार
वडूज, सातारा

# आपले संस्कार कमी पडताहेत काय ?

आधुनिक केसरी

**स्त्रीचा आदर राखायला घरातूनच शिकवले पाहिजे जर तुम्ही स्वतः बायकोला, आईला, बहिणीला, मुलीला आदर नाही दिला तर मुलेही तेच शिकणार. अनुकरणातून मुलं शिकत असतात आणि हल्लीची मुलं आपल्या आई-वडिलांचे अनुकरण बघत असतात व त्यातूनच त्यांना संस्कार व शिकवण भेटत असते. हे वेगळे सांगायला नको. समाजातील या विकृतीला कसे संपवायचे हा मोठा प्रश्नच आहे. कायद्याचा धाक असूनही अशा माणसांना कायदे म्हणजे काहीच वाटत नाही का? ही विकृती का वाढते आहे, का निर्माण होते याचे विचारमंथन करणे खरेच गरजेचे आहे.**

**गेली सांगून ज्ञानेश्वरी**
**जरा जपून चाल ग पोरी**
**माणसा परीस मेंढर बरी**
**माणसा परीस मेंढर बरी**

माणसा माणसा कधी होशील तू माणूस अशी म्हणायची वेळ आली आहे कोणाला कोणाच्या समस्यांशी देणघेणे राहिले नाही. जो तो आपापल्या जगण्यामध्ये, कामांमध्ये गुंतून आहे. शेजाऱ्यांशी, जगाशी त्याचे देणेघेणे नाही असे चालले आहे. पण हे सर्व कुठपर्यंत? जोपर्यंत समस्या, प्रश्न आपल्यापर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत. मग आपल्याला समस्या आल्या की माणूस जागा होतो, त्याच्याबद्दल बोलतो. पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते ना वो ! मग काय करायचं ?

गेली काही दिवस टीव्हीला, पेपरमध्ये येणाऱ्या बलात्काराच्या घटनांनी मन सुन्न झाले आहे व चीड येऊ लागली आहे. माणूस एवढ्या खालच्या पातळीला कसा जाऊ शकतो हेच समजेनासे झाले आहे. लहान मुली ते म्हाताऱ्या बाईपर्यंत ही विकृती कोणालाही सोडत नाही. आपल्या आया-बहिणींची अब्रू वेशीवर टाकताना यांना लाज कशी वाटत नाही.

आम्ही स्त्रीयांनी, आमच्या मुलींनी बाहेर पडावे की नाही हा प्रश्न प्रत्येक स्त्रीला सतावू लागला आहे. प्रत्येक आईला त्याच्या मुलीविषयी काळजी वाटू लागली आहे. 21 वे शतक असूनही ज्या स्त्रीने उंबरठा ओलांडून आपले कर्तृत्व सिद्ध केले तिच्यावर ही वेळ का यावी याचा विचार सर्वांनी करावा. याला जबाबदार कोण आणि या सर्व गोष्टीतून निष्पन्न काय होणार? खरंच खूप भयानक थरकाप उडवून देणारी परिस्थिती आहे ही सर्व. आतापर्यंत किती तरी निर्भया आपल्यासमोर आल्या. ते किस्से असे आहेत जे समोर मांडायचे तर काळजाचा थरकाप उडतोय माझ्या. पण ज्या स्त्रीने त्या कोवळ्या मुलीने हे सहन केले त्याची काय परिस्थिती होत असेल हे सांगणे कठीणच.

आताचा काळ कठीण आहे हे म्हणणे जर योग्य असले तरी समाजात चांगले आणि वाईट दोन्ही प्रवृत्तीची पुरुष मंडळी आहेत. तशाच स्त्रियादेखील आहेत. जर प्रश्न संस्काराचा असेल तर आई-वडिल मुलांवर असे संस्कार करत नसतात. असं कोणत्या



आई-वडिलांना वाटेल की आपल्या मुलाने वाईट मार्गाला जावे. मग चुकतय कुठे? मुलांची संगत चुकीचे आहे का? बाहेर कुठे जात आहेस, कोणाशी बोलता त्याच्यावर आपले नियंत्रण नाही का? का मोबाईलचा अतिवापर होतोय? नक्की होतंय काय हा प्रश्न प्रत्येक जबाबदार पालकांनी स्वतः ला केला पाहिजे.

स्त्रीचा आदर राखायला घरातूनच शिकवले पाहिजे जर तुम्ही स्वतः बायकोला, आईला, बहिणीला, मुलीला आदर नाही दिला तर मुलेही तेच शिकणार. अनुकरणातून मुलं शिकत असतात आणि हल्लीची मुलं आपल्या आई-वडिलांचे अनुकरण बघत असतात व त्यातूनच त्यांना संस्कार व शिकवण भेटत असते. हे वेगळे सांगायला नको. समाजातील या विकृतीला कसे संपवायचे हा मोठा प्रश्नच आहे. कायद्याचा धाक असूनही अशा माणसांना कायदे म्हणजे काहीच वाटत नाही का? ही विकृती का वाढते आहे, का निर्माण होते याचे विचारमंथन करणे खरेच गरजेचे आहे.

कोरोनामुळे अनेकाच्या नोकऱ्या गेल्या, माणसे बेरोजगार झाली, कित्तेक मुली, मुले अनाथ झाली. घरात बसून बसून माणसांना मानसिक व शारीरिक आजारांना सामोरे जावे लागत असेल तरीही प्रत्येकाने आपली सद्सदविवेकबुद्धी जागृत ठेवून वागावे. तसेच 'रिकामे डोके सैतानाचे घर' या म्हणीप्रमाणे न वागता जास्तीत जास्त व्यायाम, ध्यानधारणा, पुस्तकवाचन, ग्रंथवाचन, नामजप या गोष्टीमध्ये रमवावे व आपल्या विचारांना चांगल्या प्रकारे सकारात्मक विचारांनी पोषित करावे. नाहीतर अनेक मनोरुग्णांची वाढ होईल . व यामुळे माणूसच माणसाचा शत्रू होईल यात शंका नाही.

तेव्हा सर्व सजग मानव जातीलाच आवाहन आहे, कृपया सर्वांनी सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवा. आपल्या सभोवताली काय चालले आहे याकडे लक्ष ठेवा. वाईट गोष्टींना वेळीच आळा घाला व चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन द्या. नाहीतर हे सर्व आपल्याला ऱ्हासाकडे घेवून जाईल यात शंकाच नाही. ही आपल्या शिवबांची भूमी आहे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची भूमी आहे, अहिल्याबाई होळकर या स्त्रियांच्या कर्तुत्वाने पावन झालेली भूमी आहे. कितीतरी स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखवले आहे पी. टी. उषा, कल्पना चावला, मीराबाई चानू, लता मंगेशकर, मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी आपल्या कर्तृत्वाने या भूमीला पावन केले आहे. असे स्त्रियांवरील होणारे अत्याचार कितपत योग्य आहे सांगा ना.

स्त्री म्हणून आम्ही सबला आहोत हे केव्हाच सिद्ध केले स्त्रीने. तरीही मग तुमचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन का बदलत नाही? आम्हालाही जगण्याचा अधिकार आहे, आम्हीही माणसंच आहोत हे अजून कितीदा तुम्हाला सांगावे लागेल सांगा ना. जर स्त्रीच नसेल तर पुरुषाच्या अस्तित्वालाही काही अर्थ नसेल व जर स्त्री नसेल तर पुरुष जन्माला येणार नाही हे सत्य समजत असूनही जर स्त्रियांना त्रास होत असेल तर स्त्री ही मागे पडणार नाही. लक्षात ठेवा जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई यांचा इतिहास असलेल्या देशात आम्ही देखील जशा शास्त्रात पारंगत आहोत, तश्याच शस्त्रातदेखील पारंगत होऊन शस्त्र घ्यायला मागेपुढे पाहणार नाही. हे नक्की ! पण जर दहा-बारा जण एका मुलीवर मर्दुमकी दाखवत असाल तर त्यासारखी लाजिरवाणे आणि नीच कृत्य केल्याबद्दल तुमच्या आईलाही तुमची लाज वाटली असेल हे नक्कीच! तेव्हा विकृत माणसांनो जागे व्हा. स्त्रीला आदराने सन्मानाने वागवा नाहीतर ह्याच स्त्रीला दुर्गेचे रूप घ्यायलाही वेळ लागणार नाही हे लक्षात ठेवा.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादालाही तारीख-पे-तारीख

आधुनिक केसरी

**२००४ साली सुरू झालेला हा न्यायालयीन लढा आज २०२२ मध्येही संपलेला नाही. तारीख पे तारीख या न्यायालयाच्या धोरणानुसार प्रत्येक वेळी नवी तारीख मिळत गेली आणि खटला रेंगाळत राहिला. या खटल्याची शेवटची सुनावणी २०१७ साली झाली होती. त्यानंतर तब्बल ५ वर्षांनी म्हणजे ३० ऑगस्ट २०२२ रोजी पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीत तरी काही ठोस निर्णय समोर येईल अशी अपेक्षा सीमाभागातील नागरिकांना होती मात्र ती अपेक्षाही फोल ठरली कारण सुनावणी सुरू होताच कर्नाटक च्या वकिलांनी वेळ वाढवून मागितली त्यांना न्यायमूर्ती जोसेफ यांच्या त्रिसदस्यीय पीठाने मान्यता देऊन पुढील सुनावणी २३ नोव्हेंबरला घेण्याचे जाहीर केले. वास्तविक हा खटला लवकरात लवकर निकाली काढणे आवश्यक आहे मात्र दर सुनावणीवेळी कर्नाटक काहीतरी कारण काढून सुनावणीची तारीख वाढवून घेतो.**

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावाद हा नवा नाही. १९५६ साली सुरू झालेला हा वाद अजूनही संपलेला नाही. देश स्वातंत्र्य झाल्यावर जेंव्हा राज्यांची निर्मिती करण्यात आली तेंव्हा भाषा हा निकष ठरवण्यात आला. पंडित नेहरू यांच्या केंद्र सरकारने भाषावार प्रांत रचनेला मान्यता दिली त्यानुसार ज्या भागात जी भाषा बहुसंख्येने बोलली जाते तो भूभाग त्या राज्यात समाविष्ट होईल, असे ठरले. त्यानुसार ज्या भागात बहुसंख्येने मराठी भाषा बोलली जाते तो भाग महाराष्ट्रात समाविष्ट व्हायला हवा होता, पण तसे झाले नाही. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील सुमारे ८६५ गावे कर्नाटकात समाविष्ट करण्यात आली त्यात प्रामुख्याने बेळगाव, कारवार, धारवाड या भागातील गावांचा समावेश आहे. या भागात बहुसंख्य लोक मराठी बोलतात ते स्वतःला महाराष्ट्रीयनच समजतात आणि त्यांना महाराष्ट्रातच समाविष्ट व्हायचे आहे, त्यासाठी त्यांनी अनेकदा आंदोलने केली आहेत मात्र त्यांच्या आंदोलनलाची दखल आजवर कोणीही घेतली नाही. महाराष्ट्रात समाविष्ट करावे अशी मागणी करणाऱ्या या गावांची कर्नाटक सरकारकडून कायम मुस्कटदाबी केली जाते. महाराष्ट्र - कर्नाटक सीमावाद प्रश्न कायमचा सुटावा आणि सीमाभागातील बांधवांना न्याय मिळावा यासाठी मराठीप्रेमी असलेल्या अनेक नागरिकांनी आंदोलने केली, कारावास भोगला मात्र त्यांना न्याय मिळाला नाही. शेवटी महाराष्ट्र सरकारने न्यायालयात दाद मागितली. माननीय न्यायालय तरी सीमाभागातील बांधवांना न्याय देईल आणि तो भूभाग महाराष्ट्रात समाविष्ट होईल या आशेने २००४ साली तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला. या दाव्यात महाराष्ट्र सरकारने सीमाभागातील ८६५ गावांवर आपला हक्क सांगितला. सीमाभागातील खेडी हा घटक मानून भौगोलिक संलग्नता, भाषिक बहुसंख्यत्व व नागरिकांची इच्छा या आधारे ही गावे महाराष्ट्रत समाविष्ट व्हावीत असा दावा मागराष्ट्र सरकारने न्यायालयात केला. अर्थात कर्नाटकने



याला न्यायालयात विरोध केला. सीमाप्रश्न सोडवण्याचा अधिकार केंद्र सरकारचा असून केंद्र सरकारच यावर निर्णय घेऊ शकतो, असा दावा कर्नाटकच्या वतीने न्यायालयात करण्यात आला. २००४ साली सुरू झालेला हा न्यायालयीन लढा आज २०२२ मध्येही संपलेला नाही. तारीख पे तारीख या न्यायालयाच्या धोरणानुसार प्रत्येक वेळी नवी तारीख मिळत गेली आणि खटला रेंगाळत राहिला. या खटल्याची शेवटची सुनावणी २०१७ साली झाली होती. त्यानंतर तब्बल ५ वर्षांनी म्हणजे ३० ऑगस्ट २०२२ रोजी पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीत तरी काही ठोस निर्णय समोर येईल अशी अपेक्षा सीमाभागातील नागरिकांना होती मात्र ती अपेक्षाही फोल ठरली कारण सुनावणी सुरू होताच कर्नाटक च्या वकिलांनी वेळ वाढवून मागितली त्यांना न्यायमूर्ती जोसेफ यांच्या त्रिसदस्यीय पीठाने मान्यता देऊन पुढील सुनावणी २३ नोव्हेंबरला घेण्याचे जाहीर केले. वास्तविक हा खटला लवकरात लवकर निकाली काढणे आवश्यक आहे मात्र दर सुनावणीवेळी कर्नाटक काहीतरी कारण काढून सुनावणीची तारीख वाढवून घेतो. मागील दोन वर्षात तर कोरोनामुळे याची सुनावणीच होऊ शकली नाही. ऑनलाइन सुनावणी घ्या ही महाराष्ट्राची विनंतीही न्यायालयाने फेटाळली होती. आता ५ वर्षानंतर सुनावणी सुरू झाली मात्र पुन्हा तारीख मिळाली आता पुढील सुनावणीत तरी निकाल लागेल आणि सीमाभागातील बांधवांना न्याय मिळेल अशी आशा करूया.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# टिटवाळ्याचा महागणपती



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अष्टविनायकांचे स्थाना शिवाय महाराष्ट्रात जी गणपतीची काही प्रमुख मंदिरे आहेत,त्यात टिटवाळा येथील महागणपतीचे मंदिराचा समावेश आहे. पुण्याहून साधारणपणे दीडशे कि. मी. आहे. कल्याणहून रिक्षा, टँक्सी, टांगा, वाहनाची उपलब्धता असते. टिटवाळा मंदिर आहे, येथे पूर्वी कण्वऋषींचा आश्रम होता. शकुंतलेने याच महागणपतीची पूजा केली असे सांगितले जाते आणि म्हणूनच या महागणपतीस विवाहविनायक असेही म्हटले जाते.**

कल्याण तालुका, जिल्हा-ठाणे, कल्याण-कसारा मार्गावर काळू नदीच्या काठावर असलेले हे देऊळ प्राचीन असून याची मूळ बांधणी शकुंतलेने केली असल्याची आख्यायिका आहे. हे देउळ एका सरोवरात बांधलेले होते. यात गाळ साचून देऊळ पूर्णपणे गाळात बुजले गेले व सरोवरही नावाने राहिले. माधवराव पेशवे यांच्या राज्यात पडलेल्या दुष्काळ परिस्थितीत पाणी साठवण्याची सोय करण्यासाठी सरदार रामचंद्र मेहेंदळे यांनी या तळ्याचे उत्खनन केले. त्या उत्खननात हे देऊळ जसेच्या तसे सापडले व देवाची मूर्तीही अभंग स्वरूपात मिळाली. वसईची लढाई जिंकल्यावर माधवराव पेशव्यांनी या देवळाचे नूतनीकरण केले व मूर्तीची स्थापना केली. त्याचवेळी देवळासमोर लाकडी सभामंडप बांधला. १९९५-९६मध्ये या सभामंडपाचेहि नूतनीकरण केले .

या गणपतीच्या आशीर्वादाने मुला-मुलींचे विवाह लवकर जुळतात अशीही श्रद्धा आहे. या महागणपतीस विवाह विनायक असेही म्हणतात. सभामंडपात एक चांदीचा उंदीर आहे या उंदराच्या कानात आपली इच्छा सांगतात. शनिवार, रविवार आणि मंगळवारी तसेच संकष्टी, विनायकी, चतुर्थीला भाविकांची गर्दी असते. अनेक भाविक येथे नारळाची तोरणं बांधतात.

श्री महागणपती टिटवाळा गणपती इच्छापूर्ती गणेश म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातही, याच्या आशीर्वादाने इच्छुक वर–वधू प्राप्ती होते, लग्न जुळतात अशी श्रद्धा आहे म्हणून या गणपतीच्या भक्तांमध्ये तरुण–तरुणींची संख्या जास्त असते. मंदिर तेजस (काळू) नदीच्या काठावर आहे. साडेतीन फूट उंचीची मूर्ती शेंदुराने माखलेली आहे. डोळे व नाभी स्फटिक मण्यांनी मढवलेली आहे. मूर्तीच्या चरणाशी यक्ष-गंधर्व व डाव्या–उजव्या बाजूला रिद्धी–सिद्धी आहेत. मूर्ती डाव्या सोंडेची आहे.

पुराणकाळात राजा दुष्यन्ताला शकुंतलेची विस्मृती झाल्यानंतर कण्व मुनींनी या गणेशाची स्थापना करून शकुंतलेला गणपतीची उपासना करण्यास सांगितले. शकुंतलेने त्याप्रमाणे उपासना केल्यानंतर ती दुर्वास ऋषींच्या शापातून मुक्त झाली. राजा दुष्यन्ताला तिची आठवण झाली आणि शकुंतला-दुष्यन्ताचे पुन्हा मीलन झाले, अशी आख्यायिका सांगतात. या मंदिराला छत्रपती शिवाजी महाराज, आणि माधवराव पेशवे यांनीही भेट दिल्याचे सांगतात.

दुर्वास ऋषींचे यथायोग्य स्वागत न केल्यामुळे शकुंतलेला शाप मिळाला आणि राजा दुष्यंताला शकुंतलेचा विसर पडला. उत्साहाने पतीगृही गेलेली नवीन शकुंतला त्यामुळे आल्या पावली परत फिरली. कण्व ऋषींकडे परत आलेल्या या शकुंतलेने गणपतीची आराधना केली आणि दुष्यंताला सारे काही आठवले. शकुंतलेला तिचे प्रेम परत मिळवून देणारा गणपती म्हणजेच टिटवाळ्याचा महागणपती. महाराष्ट्रातल्या अष्टविनायकांप्रमाणेच हे श्रीगणपती क्षेत्रही प्रसिद्ध आहे. याच परिसरात पूर्वी कण्व



ऋषींचा आश्रम होता. शकुंतला इथेच वाढली. त्यामुळेही या ठिकाणाला एक प्राचीन महत्त्व आहे. गणपतीचे मंदिर तसे साधेच आहे. शेंदरी रंगाची रेखीव मूर्ती मंदिरात प्रवेश करताच आपले लक्ष वेधून घेते. रेखीव चेहरा, पुढे आलेली सोंड यामुळे मूर्तीला एक ठसठसीतपणा आला आहे. सिंहासनावर बसलेल्या अवस्थेतील ह्या मूर्तीच्या चार हातात आयुधे आहेत. मूर्तीला रोज नेटकेपणाने पितांबर नेसवला जातो. डोक्यावर चांदीचा मुकुट आहे. मुर्तीवर चांदीचेच छत्र आहे. इथे फुलांची सुरेख आरस केलेली असते. ही गणपतीची मूर्ती गाभाऱ्यात प्रवेश केल्यापासून आपली नजर खिळवून ठेवते. त्यामुळे आपण आजूबाजूला बघण्याचेच विसरुन जातो. जेथे गणपतीची मूर्ती आहे तो संपूर्ण देवारा चांदीचा बारीक कलाकुसर केलेला आहे.. गाभारा आणि सभा मंडप यामध्ये जाळी लावून वेगळे केले आहे. गाभाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या दाराने बाहेर पडून आपण सभा मंडपात पोहचतो. इथे तालात, सुरात गणपती, अर्थवशीर्षाची आवर्तनं सुरू असतात. सत्य विनायक, गणेश याग इत्यादी भक्तांनी बांधलेल्या पूजा सुरू असतात. त्यांचा एकत्रित ऐकू येणारा नाद मनाला शांती देऊन जातो. प्रसन्नता वाटते.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे गाभाऱ्यात प्रवेश केल्यापासून ते सभा मंडपातून बाहेर पडेपर्यंत मूर्तीचे सतत दर्शन आपल्याला होत असते. मंदिराच्या आवारात एक छोटी दिपमाळ आहे. या मंदिरापासून काही अंतरावर एक तलाव आहे. हा एकंदर परिसरच खूप रमणीय आहे. महागणपतीचे दर्शनाने मनाला शांती, समाधान मिळते हे नक्कीच. आपणही याचा अनुभव घ्यावा.

# विदर्भातील अष्टविनायक



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**गणपती सगळीकडंच बसतात. त्यातील पुण्याचे गणपती विशेष प्रसिद्ध आहेत. कारण त्यांचा गाजावाजा झाला. परंतु विदर्भातही अष्टविनायक आहेत. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होईल. परंतू ते सत्य आहे. विदर्भातही अष्टविनायक आहेत. खालील प्रकारचे आठही गणपती विदर्भात असून त्याला अष्टविनायक संबोधतात. त्या-त्या भागातील हे गणेश आपआपले स्थान टिकवून आहेत. ते नवसाला पावतात असेही म्हटले जाते. याही स्थानावर देश विदेशातून भरपूर पर्यटक दर्शनासाठी येत असून बाराही महिने या ठिकाणची मंदिरं दर्शनासाठी खुली आहेत.**

## नागपूरचा टेकडी गणेश

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असलेलं शहर म्हणून नागपूरची ओळख असून इथे एका टेकडी भागात एक गणपती आहे. त्याला गणेश टेकडी असं नाव दिलं आहे. हे टेकडी मंदिर नागपूरच्या मध्यवर्ती रेल्वेस्टेशनजवळ असून ते नागपूरातील सर्वात मोठे गणपती मंदिर आहे. याला प्राचीन वारसाही लाभलेला आहे. या मंदिराचं बांधकाम अर्वाचीन असून राजे भोसले यांनी अठराव्या शतकात बांधल्याचे उल्लेख मिळतात. तशी मूर्ती बरीच प्राचीन आहे. हा गणेश नवसाला पावतो असेही म्हटले जाते.

## आदास्याचा विघ्नेश





आदासा हे नागपूर जिल्ह्यातील व सावनेर तालुक्यातील एक गाव. हे ठिकाण नागपूरपासून अंदाजे चाळीस किमीच्या अंतरावर असून पाटनसावंगी या रेल्वेस्थनकापासून बारा किमी अंतरावर आहे. हे मंदिर उंच टेकडीवर असून ही मुर्ती नृत्यगणेशाची आहे असं मानलं जातं. या गणेशाची एक आख्यायीकाही आहे. म्हटले जाते की ही गणेशमूर्ती उजव्या सोंडेची असून महापाप, संकट, शत्रू याची तारणहार आहे. पूर्वी या तीनही गोष्टींनी जगाला त्राही त्राही करुन सोडले होते. तेव्हा सर्व देवांनी शमीच्या वृक्षाखाली गणेशाची आराधना केली. तेव्हा त्या वृक्षाच्या मुळापासून शमी विघ्नेश प्रगट झाले. त्याने वरील तीनही दानवाचा नाश केला. ज्या ठिकाणी महागाई, संकट व शत्रू या नावाच्या तीनही दानवाचा नाश झाला, तिथे मुद्दल मुनींनी गणेशाची स्थापना केली. इथे दरवर्षी ममाघ शुद्ध चतुर्थीला मोठी यात्रा भरते. विदर्भातील अष्टविनायकापैकी हे स्थान प्रथम क्रमांकावर असून ती महाराष्ट्रातील सर्वात उंच गणेशमुर्ती आहे. ही उंची जवळपास सहा मीटर असून हे बांधकाम हेमाडपंथी वाटते.

## कळंबचा चिंतामणी

विदर्भातील अष्टविनायकापैकी एक गणपतीचं मंदिर यवतमाळ जिल्ह्यातील कळंब इथे आहे. ते गाव यवतमाळ पासून अंदाजे तेवीस किमी अंतरावर असून या गणेशाला चिंतामणी असं नाव आहे. हा गणेश पस्तीस फुट खोलात असून मंदिराच्या प्रवेशद्वारातून पाय-या उतरुन खाली जावं लागतं. खाली उतरल्यावर एक कुंड लागते. याला गणेशकुंड म्हणतात. म्हटलं जातं की या कुंडातून दर बारा वर्षांनी आपोआप पाणी बाहेर येतं. हे कुंड अंकुशानं स्वतः गणपतीनं तयार केलं. तसेच याची स्थापना प्रत्यक्ष देवराज इंद्र यांनी केल्याचे वर्णन पुराणात आहेत. यामागं एक लोककथाही आहे. म्हणतात की ब्रम्हदेवानं एक लावण्यवती स्त्री निर्माण केली. तिला आपली मुलगी मानली. तिचं नाव अहिल्या ठेवलं. ती सुंदर होती. त्यामुळं तिच्यावर देव, दानव, यक्ष, गंधर्व, किन्नर, नाग, मानव सारे मोहित झाले होते. तिचा विवाह करायचे ब्रम्हदेवानं जाहिर केलं. परंतू एक अट ठेवली. जो कोणी पृथ्वी प्रदक्षिणा करुन पहिला येईल. त्याला ती देण्यात येईल. अटीनुसार सर्व निघाले पृथ्वीप्रदक्षिणा करायला. ही अट महर्षी गौतमाच्या कानी आली. त्यांनी प्रसूत होणा-या गाईलाच प्रदक्षिणा मारली व शास्त्राप्रमाणे ब्रम्हदेवाला अहिल्येची मागणी घातली. ब्रम्हदेवानं शास्त्र शिरोधार्य मानून गौतमाला आपली कन्या दिली. पृथ्वीप्रदक्षिणा आटोपून देवराज इंद्र प्रथम परत आला. त्यांना अहिल्या विवाहाची बातमी कळली. परंतू आता विवाह झाला होता. अहिल्याशी आता विवाह करता येत नव्हता. काय करावे. इंद्र विचार करु लागला. शेवटी त्यानं मुनी गौतमाचं रुप धारण करुन अहिल्येशी समागम केला. अहिल्येशी असा दुराचार करणे हे मुनी गौतमाला माहित झाले. त्यांनी त्यास महारोगी होण्याचा शाप दिला. इंद्राने त्यावर मुनीवर गौतमाची क्षमा मागीतली. त्यावर गौतमानं माफी देत गणेश षडाक्षर मंत्राचा त्यास जाप करण्यास सांगीतले. तसेच विदर्भात या कळंब जवळ जावून तपश्चर्या करण्यास सांगीतले. इंद्राच्या तपश्चर्येनं गणेश प्रसन्न झाले व ते प्रगट झाले. त्यांनी इंद्राची कैफियत ऐकली व आपल्याजवळच्या अंकुशानं त्यांनी एक कुंड निर्माण केले. तेच गणेश कुंड होय. याच कुंडात स्नान करुन इंद्र रोगमुक्त झाले होते. स्नान झाल्यावर इंद्रानं इथे गणेशमुर्तीची स्थापना केली. गणेश अभिषेकासाठी त्यांनी स्वर्गातून गंगेला पाचारण केले व तिला आदेश दिला की तिनं दर बारा वर्षांनी येवून गणेशाच्या पायाला स्पर्श करावा. त्यानुसार दर बारा वर्षांनी गंगा या कुंडातून बाहेर येते व गणेशाच्या पायाला स्पर्श करुन निघून जाते. इथे गणेशाची एकमात्र दक्षीणाभिमुख मुर्ती असून गणेशाच्या प्रवेशद्वाराजवळील सभामंडपाची निर्मीती प्रत्यक्ष बालगंधर्वानं केलेली असल्याचं मानलं जातं.

## ४)रामटेकचा अष्टदशभुज

हे मंदिर रामटेकच्या तेलीपुऱ्यात आहे. रामटेक हे नागपूरपासून अंदाजे छेचाळीस किमी अंतरावर असून या मंदिरातील मुर्तीला अठरा हात आहेत. या मुर्तीची उंची एक मीटर असून हातात अंकु, पाश, त्रिशूळ आहे. ही मुर्ती अंदाजे अकरा बाराच्या शतकातील आहे असे मानले जाते.

## वरदविनायक

हे मंदिर भद्रावतीजवळ असून भद्रावतीहून तीन किमीच्या अंतरावर आहे. हेही मंदिर टेकडीवर असून ह्या टेकडीवर असलेली गणेशाची मुर्ती भव्यदिव्य आहे. ही मुर्ती विहिरीसारख्या खोल गाभा-यात आहे. हेही मंदिर हेमांडपंथी आहे. तसेच मंदिराचे बांधकाम बाराव्या शतकातील वाटते. मुर्ती मात्र त्याहूनही प्राचीन आहे.

## भृशुंड गणपती

विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील मेंढा गावात असलेलं हे मंदिर. भंडाऱ्यावरुन अवघ्या तीन किमी अंतरावर आहे हे मंदिर. या मंदिरात असलेली मुर्ती ही लाल रंगाच्या दगडात कोरलेली असून ही मुषकारुढ प्रतिमा आहे. हातात पाश, अंकुश व मोदक आहे.

## सिद्धीविनायक

विदर्भातील सिद्धीविनायक म्हणून प्रसिद्ध असलेला केळझरचा गणपती विशेष प्रसिद्ध आहे. येथील गणपतीही उजव्या सोंडेचा असून मुर्ती चार फुट उंच आहे. या गणपतीच्या देवस्थानाला एकचक्रा असेही म्हणतात. तसेच या स्थानाला महीभारत कालीन परंपरा लाभलेली आहे असेही मानले जाते. हा गणेश वर्धा जिल्ह्यात असून विदर्भातील अष्टविननायकात या गणेशाचा तिसरा क्रमांक लागतो.

## सर्वतोभद्र

पवनीचा सर्वतोभद्र हा गणपती विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असून पवनी नावाच्या पुरातन शहरात हा गणेश वसलेला आहे. शहराच्या उत्तर दिशेला वैनगंगेचं पात्र आहे. इतर दिशेला दगडी तटबंदी आहे. या गणेशाला गणेशपट्ट असेही म्हणतात. येथे राहणाऱ्या भट यांच्या घरासमोर जे चार स्तंभ आहेत. त्या चारही स्तंभावर गणेशाची प्रतिमा कोरलेली आहे. तर कर्णछेदावर पाचवी प्रतिमा आहे. अशा प्रकारचा सर्वतोभद्र गणपती विलक्षण असा गणपती समजला जावून त्याला विदर्भातील अष्टविनायकात स्थान मिळाले आहे.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# श्रमशक्ती क्षेत्रात महिलांचा सहभाग कमीच

आधुनिक केसरी

**गेल्या दोन दशकांत भारतातील स्त्री शिक्षणाची स्थिती सुधारली आहे. प्रजनन दर कमी झाला आहे. या कारणांमुळे जगभरात महिलांचा कामातील सहभाग वाढताना दिसत आहे, परंतु भारतात तसे होताना दिसत नाही. उलट कर्मचाऱ्यांमध्ये जेवढी भर पडत आहे, त्यापेक्षा जास्त स्त्रिया कामातून बाहेर पडत आहेत. तसे स्त्रिया बँकांमध्ये काम करताना चांगल्या संख्येने दिसतील, महानगरे आणि मोठ्या शहरांमध्ये रेल्वे काउंटरवर त्यांची उपस्थिती कमी आहे, काही विमाने उडवतात, परंतु महिला बस कंडक्टर, टॅक्सी आणि ऑटो रिक्षाचालक अशा क्षेत्रात संख्या नगण्य आहे.**

गेल्या दोन दशकांत भारतातील स्त्री शिक्षणाच्या परिस्थितीत सुधारणा झाली आहे. महिलांचा पारिश्रमिक कामातील सहभागदेखील वाढत चालला आहे. मात्र यात अजून वाढ होण्याची आवश्यकता आहे. देशातील महिलांच्या लोकसंख्येच्या तुलनेत ही आकडेवारी फारच कमी आहे. मोठ्या किंवा वरिष्ठ पदावर तर फारच मोजक्या महिला कार्यरत आहेत. हे चित्र बदलणे गरजेचे आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला बातमी आली होती की सार्वजनिक क्षेत्रातील दिग्गज तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाच्या इतिहासात प्रथमच एका महिलेने अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून पदभार स्वीकारला आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी अलका मित्तल यांची निवड झाली आहे. याआधीही देशातील काही बँकांमध्येही महिलांनी सर्वोच्च पदावर काम केले आहे. अशी इतरही तुरळक उदाहरणे आहेत. या सर्व बातम्यांमुळे कदाचित भारताच्या कर्मचाऱ्यांमध्ये स्त्रियांना योग्य स्थान आहे असे वाटू शकते, परंतु येथे नमूद केलेली उदाहरणे नियमापेक्षा अपवाद आहेत. ज्याप्रमाणे भारत इतर अनेक बाबतीत अनेक विकसनशील देशांपेक्षा मागे आहे, त्याचप्रमाणे महिलांच्या श्रमशक्तीच्या सहभागाच्या बाबतीतही देशाची स्थिती उत्साहवर्धक नाही.

बेरोजगारी ही निश्चितच देशासमोरील प्रमुख समस्यांपैकी एक आहे. देशात मोठ्या संख्येने लोक बेरोजगार आहेत, परंतु या बेरोजगारांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. शिवाय चिंतेची बाब म्हणजे सर्व नोकरदार लोकांमध्ये महिलांचा वाटा वाढण्याऐवजी कमी होत आहे. सामाजिक समतेच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास किंवा मानवी हक्कांच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास, देशाच्या कार्यशक्तीमध्ये महिलांचे योग्य प्रतिनिधित्व नसणे ही गंभीर चिंतेची बाब आहे. ज्या भारताची कल्पना देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झाली, ती परिस्थिती पंचाहत्तरीनंतरही जुळलेली नाही. स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत आपण अजूनही मागे आहोत. या विषमतेची कारणे शोधण्यासाठी आपल्याला फार दूर जाण्याची गरज नाही. समाजात पुरुषप्रधान संस्कृती कायम आहे आणि कुठेतरी महिलांना त्यांचे हक्क देऊन त्यांची बाजू घेतली जात असल्याचेही चित्र आहे.

तथापि, काही परिस्थिती निश्चितपणे बदलल्या आहेत. अनेक घरांमध्ये अभ्यासाच्या बाबतीत मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जात नाही. जसे मुलांना त्यांच्या आवडीचे करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य आहे, तसेच मुलींनाही आहे. आता मुलीही अभ्यास आणि नोकरीसाठी घरापासून दूर जात आहेत. मुली प्रत्येक क्षेत्रात काम करू शकत नाहीत हा विचारही लोक सोडून देत आहेत. वृत्तीतील या बदलामुळे आज लाखो तरुणींना माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपले पाय रोवण्याची संधी मिळाली आहे. अन्यथा तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्र महिलांसाठी नाही, असाही समज होता. देशात अशी अनेक कुटुंबे आहेत ज्यांनी मुलींचे पंख कापलेले नाहीत, त्यांना पुढे जाण्यापासून रोखले नाही आणि आज या घरातील मुली नागरी सेवेत आणि इतर प्रतिष्ठेच्या भूमिकेत आहेत.



मानसशास्त्रज्ञ आणि वर्तणूक शास्त्रज्ञांनी वारंवार पुनरुच्चार केला आहे की प्रतिभा पुरुष आणि स्त्रिया यांच्यात फरक करत नाही. स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी हुशार असतात हे कोणत्याही प्रयोगात सिद्ध झालेले नाही, परंतु अनेक भूमिका अशा नोंदवल्या गेल्या आहेत ज्यात स्त्रिया अधिक चांगली कामगिरी करतात. महिलांना त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत आणि त्यांनी त्या चांगल्या प्रकारे पार पाडल्या आहेत, अशा उदाहरणांची कमतरता नाही. कोणत्याही आधाराशिवाय स्त्रियांना कमकुवत किंवा अक्षम समजणे हे कुठेतरी अपरिपक्व विचार दर्शवते. ही विचारसरणी बदलत आहे, पण ती हवी तशी नाही. ही विचारसरणीही पूर्णपणे सुधारेल तेव्हाच स्त्रियांच्या स्थितीत मोठी सुधारणा होईल.

लोकसंख्येच्या प्रमाणात स्त्रियांचा श्रमशक्तीमध्ये सहभाग नाही, ते प्रामुख्याने सामाजिक कारणांमुळे आहे. कोणत्याही देशाची समृद्धी आणि तिची अर्थव्यवस्था भरभराटीला येण्यासाठी त्यात महिलांचा पूर्ण सहभाग असायला हवा, असे अनेक संशोधनांतून आणि अभ्यासांतून सांगण्यात आले आहे. शाश्वत विकास आणि शांततापूर्ण सहअस्तित्वासाठी लैंगिक समानता आवश्यक असल्याचेही संयुक्त राष्ट्रांचे म्हणणे आहे.

सर्व पुरोगामी संस्थांनी मानव संसाधनासाठी विविधीकरण आणि समावेशण धोरणे लागू केली आहेत. मनुष्यबळात सर्व घटकांचे योग्य प्रतिनिधित्व करणे आणि दुर्बलांना संधी देणे हा त्याचा उद्देश आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून आले आहेत आणि कॉर्पोरेट जगतात महिलांसाठी संधी वाढत आहेत, परंतु देशातील उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून केवळ मर्यादित लोक मोठ्या कंपन्या आणि फर्ममध्ये रोजगार मिळवू शकतात, कारण मोठ्या संख्येने नोकऱ्या नाहीत.

गेल्या दोन दशकांत भारतातील स्त्री शिक्षणाची स्थिती सुधारली आहे. प्रजनन दर कमी झाला आहे. या कारणांमुळे जगभरात महिलांचा कामातील सहभाग वाढताना दिसत आहे, परंतु भारतात तसे होताना दिसत नाही. उलट कर्मचाऱ्यांमध्ये जेवढी भर पडत आहे, त्यापेक्षा जास्त स्त्रिया कामातून बाहेर पडत आहेत. तसे स्त्रिया बँकांमध्ये काम करताना चांगल्या संख्येने दिसतील, महानगरे आणि मोठ्या शहरांमध्ये रेल्वे काउंटरवर त्यांची उपस्थिती कमी आहे, काही विमाने उडवतात, परंतु महिला बस कंडक्टर, टॅक्सी आणि ऑटो रिक्षाचालक अशा क्षेत्रात संख्या नगण्य आहे. भारतात ई-व्यवसायाचा बराच विस्तार झाला आहे. घरी बसून तयार खाद्यपदार्थांची ऑर्डर देणाऱ्यांमध्ये पुरुषांसह महिलांचाही समावेश आहे. मात्र घरी सामानाची डिलिव्हरी करणारी महिला असल्याचे कधीच दिसले नाही. कारखान्यांमध्येही वाहने असोत किंवा खतासारखे अन्य साहित्य असो, महिलांची संख्या नगण्य आहे. होय, अशी चित्रे नक्कीच पाहायला मिळतात ज्यात महिला घड्याळ किंवा मोबाईल फोनच्या कारखान्यात काम करत आहेत. पण एकूणच उत्पादन क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या खूपच कमी आहे.

सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया( एसईबी आय) ने काही वर्षांपूर्वी एक महत्त्वपूर्ण आदेश जारी केला होता, ज्यामध्ये 300 कोटी रुपयांची वार्षिक विक्री असलेल्या सूचीबद्ध कंपन्यांना बोर्डावर स्वतंत्र महिला संचालक असणे अनिवार्य केले होते. याशिवाय, बाजार भांडवलानुसार देशातील शीर्ष 1000 सूचीबद्ध कंपन्यांच्या संचालक मंडळावर स्वतंत्र संचालक असलेल्या एका महिला सदस्याची नियुक्ती करणे देखील बंधनकारक होते. पण या अपेक्षा पूर्ण करण्यात कंपन्यांना खूप अडचणी आल्या.

अनेक कंपन्या यासाठी तयार नव्हत्या. त्यानंतर काही कंपन्यांच्या प्रवर्तकांनी आपल्या जवळच्या नातेवाईकांकडून एका महिलेला संचालक निवडले आणि त्यांना लगेच रजा मिळवून दिली. सेबीचा हा आदेश कंपन्यांच्या व्यवस्थापन विभागात लैंगिक विविधता आणण्यासाठी होता, परंतु या आदेशाच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेने अनेक पातळ्यांवर सिद्ध झाले की अनेक कंपन्या नेतृत्वात महिलांच्या सहभागाबाबत किती उदासीन आहेत तसेच इतक्या मोठ्या लोकसंख्येमध्ये संचालक नेमण्यासाठी पुरेशा महिला शोधणे सोपे नव्हते.

एखादी व्यक्ती असो वा देश, त्यात अंतर्भूत असलेल्या शक्यतांचा उदय होतो आणि या शक्यतांचा पुरेपूर वापर केला जातो यातच तिचे यश मानले जाते. जर महिलांसाठी कर्मचाऱ्यांमध्ये नवीन दारे उघडली गेली, तर सर्व महिलांमधील अंतर्निहित क्षमता लक्षात घेण्याचा मार्ग मोकळा होईल आणि आपण आपल्या देशाच्या लोकसंख्येतील संभाव्यतेचा फायदा घेऊ शकू. यासाठी सरकार आणि खासगी क्षेत्राला नव्याने पुढे यावे लागेल.



रमाकांत मुंडे, मुंबई

# सामाजिक समस्येकडे लक्ष वेधणारा 'मेरिट ॲनिमल'

आधुनिक केसरी

**प्रदीप देशमुख आणि रीना जाधव निर्मित, मेरिट ॲनिमल्स या चित्रपटाचे दिग्दर्शन जुनेद इमाम यांनी राजराजेश्वर फिल्म्स आणि महालक्ष्मी सिनेव्हिजनच्या बॅनरखाली केले आहे. चित्रपटाचे संगीत रोहित नागभिडे यांनी दिले असून गीतलेखन वैभव देशमुख यांनी केले आहे. चित्रपटाचे छायाचित्रकार गिरीश जांभळीकर आणि कुणाल श्रीगोंदेकर आहेत. या चित्रपटात रीना जाधव, मंगेश नाईक, आदित्य सिंघल, महेश चग, बहार उल इस्लाम आणि भाग्यरतीबाई कदम यांच्या भूमिका आहेत. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हा चित्रपट आघाडीच्या ओटीटी प्लॅटफॉर्म हंगामावर प्रदर्शित होणार आहे.**


अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये प्रेक्षकांनी पसंत केलेला पुरस्कार विजेता हिंदी चित्रपट मेरिट ॲनिमल आता हंगामा ओटीटीवर रिलीजसाठी सज्ज आहे. अभिनेत्री-निर्मात्या रीना जाधव यांचा चित्रपट एका अतिशय महत्त्वाच्या सामाजिक समस्येकडे लक्ष वेधतो, ज्याला आजकाल पालक आपल्या मुलांवर प्रथम आणण्यासाठी दबाव आणतात. मेरिट ॲनिमल वरुण नावाच्या मुलाभोवती फिरते, वरुणच्या पालकांना त्याने सर्व क्षेत्रात सर्वाधिक गुण मिळवावेत अशी इच्छा आहे. शहराच्या सीमेवर असलेल्या टेकडीवर सायकल रेसिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शर्यत सुरू होणार असतानाच वरुण गायब झाला. चित्रपटाची कथा समाजातील गंभीर समस्येवर प्रकाश टाकते. आमची स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आम्ही आमच्या मुलांवर आमचे सर्वोत्तम काम करण्याचा भार टाकतो जे त्यांच्यासाठी खरोखरच एक दबाव आहे. प्रत्येकाला या शर्यतीत अव्वल व्हायचे असते, पण यादरम्यान तो आपल्या निरागस बालपणाकडे दुर्लक्ष करतो.



निर्मात्या : अभिनेत्री रीना जाधव

प्रदीप देशमुख आणि रीना जाधव निर्मित, मेरिट ॲनिमल्स या चित्रपटाचे दिग्दर्शन जुनेद इमाम यांनी राजराजेश्वर फिल्म्स आणि महालक्ष्मी सिनेव्हिजनच्या बॅनरखाली केले आहे. चित्रपटाचे संगीत रोहित नागभिडे यांनी दिले असून गीतलेखन वैभव देशमुख यांनी केले आहे. चित्रपटाचे छायाचित्रकार गिरीश जांभळीकर आणि कुणाल श्रीगोंदेकर आहेत. या चित्रपटात रीना जाधव, मंगेश नाईक, आदित्य सिंघल, महेश चग, बहार उल इस्लाम आणि भाग्यरतीबाई कदम यांच्या भूमिका आहेत. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हा चित्रपट आघाडीच्या ओटीटी प्लॅटफॉर्म हंगामावर प्रदर्शित होणार आहे.





या चित्रपटाने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये प्रेक्षकांची तसेच ज्युरींची मने जिंकली आहेत. चित्रपटाने इस्तंबूल चित्रपट पुरस्कार, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (पदार्पण) - युरोप चित्रपट महोत्सव, सर्वोत्कृष्ट प्रेरणादायी चित्रपट - टोकियो चित्रपट पुरस्कार, सर्वोत्कृष्ट शैक्षणिक चित्रपट - आवृत्ती स्प्रिंग सिनेफेस्ट, इंडो फ्रेंच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, अहमदाबाद बालचित्रपट महोत्सव, दरभंगा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. फिल्म फेस्टिव्हल, सहरसा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, म्युझियम टॉकीज फिल्म फेस्टिव्हलमध्येही अधिकृत निवड झाली आहे.

अभिनेत्री रीना जाधव म्हणाली, "ही कथा आजच्या शिक्षण व्यवस्थेवरचा प्रश्न नाही, ती मुलांच्या पालकांबद्दल बोलते जे मुलांवर त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी ओझे टाकतात. गुणवत्तेच्या या शर्यतीत प्रत्येकजण अव्वल आहे. जगायचे आहे पण आपण दुर्लक्ष करतो. आमचे बालपण. मेरिट ॲनिमल हा चित्रपट आमच्या समाजासाठी डोळे उघडणारा ठरेल. आम्ही हा चित्रपट ओटीटी वर प्रदर्शित करत आहोत जेणेकरुन या सणासुदीच्या हंगामात चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांना पाहता येईल.




# सी.एस.एम.एस.एस. छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग “सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय” या पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 'इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली' या संस्थेने सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय - 2022 या वर्षीचा पुरस्कार औरंगाबाद येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग या महाविद्यालयास देऊन सन्मानित करण्यात आले. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली ही देश पातळीवरील अभियांत्रिकी क्षेत्रातील नामांकित राष्ट्रीय संस्था आहे. औद्योगिक क्षेत्राला लागणारे तांत्रिक कुशल मनुष्यबळ विकसित करणे व नवनवीन तंत्रज्ञानाची शैक्षणिक क्षेत्राशी सांगड घालणे. या प्रमुख उद्देशाने 1941 साली या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.
भारतातील अडीच हजारांपेक्षा जास्त संस्था (IITs, IISCs, NITs आणि इतर अग्रमानांकित तंत्रज्ञान महाविद्यालय व संस्था), एक लाखांपेक्षा जास्त तंत्रज्ञान क्षेत्रातील प्राध्यापक तसेच पाच लाखांपेक्षा जास्त अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी या राष्ट्रीय संस्थेचे सभासद आहेत. सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय या पुरस्कारासाठी छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने यशस्वीरित्या राबविलेल्या शैक्षणिक, सामाजिक, तंत्रज्ञान विषयक तसेच नाविन्यता, संशोधन, उद्योजकता




विकास आणि कॅम्पस प्लेसमेंट या विविध उपक्रमामुळे हा मानाचा बहुमान महाविद्यालयास प्राप्त झाला आहे.
ISTE च्या 51 व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनात दि.27 ऑगस्ट 2022 रोजी गोवा येथे हा पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांना 'गोवा' या राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडिएशनचे (NBA) चेअरमन प्रा. के.के. अग्रवाल आणि ISTE चे अध्यक्ष प्रतापसिंह देसाई यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे म्हणाले की आमच्या महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वृंद, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी यांच्या अथक परिश्रमामुळे व पालक, औद्योगिक क्षेत्र आणि संस्थेचे अध्यक्ष व सचिव तसेच सर्व व्यवस्थापन मंडळ यांच्या सहकार्य, बहुमूल्य आणि अथक परिश्रम आणि मार्गदर्शनामुळे आम्ही या सर्वोत्कृष्ट पुरस्कारास पात्र ठरलो. या पुरस्कारातून प्रेरणा आणि ऊर्जा घेऊन भविष्यात अधिकाधिक समाजाभिमुख व देशोपयोगी उत्कृष्ट मेहनती अभियंते घडविण्याचे कार्य अधिक जोमाने करूत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
अभियांत्रिकी महाविद्यालयास मिळालेल्या सर्वोत्कृष्ट सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंजि. रणजीत मुळे, सचिव पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, मानव संसाधन अधिकारी अशोक आहेर आणि जनसंपर्क अधिकारी संजय पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**"कुठल्याही संस्थेची प्रगती आणि भरभराट ही त्या संस्थेमधील मनुष्यबळाच्या कार्यकुशलता आणि मेहनतीवर अवलंबून असते. आमच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांच्या मेहनत आणि सकारात्मक दृष्टीकोनामुळे महाविद्यालय हे यश संपादन करू शकले. याप्रसंगी मी आमच्या अभियांत्रिकीच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन, कौतुक करतो आणि पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देतो."**

**पद्माकरराव मुळे**
**सचिव, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, कांचनवाडी, पैठण रोड, औरंगाबाद.**




# उपळा येथे राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत पोषण माह कार्यक्रमाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**उस्मानाबाद :** जिल्ह्यामध्ये पोषण माह १ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत राबविला जाणार आहे. या अभियानाची सुरुवात तेर अंतर्गत येणाऱ्या उपळा या गावांमधून करण्यात आली आहे. पोषण अभियान संकल्पना, त्याचे उद्देश आणि महत्त्व याबद्दल सविस्तर मार्गदर्शन प्रकल्प अधिकारी राठोड यांनी केले. पोषण माह मोहिमेच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत आणि स्थानिक समुदायाच्या महत्वाच्या भूमिकेचा उल्लेख केला. चांगल्या पोषणाच्या सवयी यावर लक्ष केंद्रित करून, जे की बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींना उपयुक्त असण्याबरोबरच कुपोषण मुक्तता हा उद्देश ठेवून, त्यानंतर समुदाय जागृतीसाठी गावातील मुख्य रस्त्यावरून रॅली काढण्यात आली. शुभारंभ कार्यक्रमात चिमुकलल्यांची प्रमुख भूमिका होती, त्यांनी पोषणविषयक संदेश देणारे आकर्षक पोषाख परिधान केला होता. रॅलीनंतर समारोप झाला.
कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि आयोजन तेर येथील सर्व अंगणवाडी सेविका इ. यांनी सुंदर रीतीने केले होते. शुभारंभ कार्यक्रमात तेर प्रकल्प अधिकारी राठोड, पर्यवेक्षिका सौ. सोनवणे, गावचे सरपंच व सदस्य, अंगणवाडी सेविका, आशाताई, ज्येष्ठ नागरिक, पालक आणि पिरामल फाऊंडेशनचे फेलोज अक्षय व नागेश उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या अभिवादनाने झाली.

# लोणार तालुक्यातील अवैध धंदे तत्काळ बंद करा : राजेश मापारी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असून या ठिकाणी सुरू असलेल्या अवैद्य धंद्यामुळे तरुण मुले मोठ्या प्रमाणात अवैध धंद्याकडे दारूकडे वळणे व्यवसाधीन होऊन घरचे शेतातील पिके विकतात व यातून भांडणे होऊन आत्महत्याही होत आहे. तालुक्यातील २०२१-२०२२ या वर्षांमध्ये २७-२८ वयातील २३ तरुण मुलांनी आतापर्यंत आत्महत्या केली आहे. पिंपळनेर व ते वडगाव तेजन या दोन गावातील ११ तरुणांनी आत्महत्या केली आहे. तालुक्यात पत्त्याचे क्लब, वरली अड्डे, ऑनलाईन चकरी, गुटखा, रेशनकार्डवर मिळालेला माल खुलेआम पणे खरेदी करून विकल्या जात आहे. आपल्या राज्यात गुटखा पुड्याची बंदी असताना मोठ्या प्रमाणात सुगंधीयुक्त पुड्याचा व्यापार सुद्धा तालुक्यामधून मोठ्या प्रमाणात होत आहे. ऑनलाइन चक्रियामध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण तरुण ओढला जात आहे.



अवैद्य धंद्यामुळे शहराची शांतता भंग होत असून अवैध धंदे बंद करण्याबाबत पोलीस अधीक्षक यांना आदेश देऊन सात दिवसाच्या आत बंद करण्यात यावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करू, असे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमेटीचे तालुका अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य राजेश मापारी यांनी केली आहे.




# माळीवाडगाव जि.प. शाळेची शालेय व्यवस्थापन समिती बिनविरोध; अध्यक्षपदी सुरेश मोरे तर उपाध्यक्षपदी नितीन सोमवंशी

आधुनिक केसरी न्यूज

**लासुर स्टेशन :** माळीवाडगाव ता. गंगापूर येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची आज दि.2 रोजी खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सुरेश मोरे तर उपाध्यक्षपदी नितीन सोमवंशी यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडीनंतर शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांचा व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.
यापसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक मगन चौधरी, माळीवाडगावचे उपसरपंच विजय तुपे, लासुरटेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर वाघचौरे, विठ्ठल जिते, नितीन वाघ, मच्छिंद्र जिते, आसाराम काळवणे, सिद्धार्थ बनकर, विकास वाघचौरे, संजय वाघचौरे, योगेश जाधव, जालिंदर वाघचौरे, राजू मोरे, मंगलबाई जाधव, योगेश अनवेकर, कडूनाथ पवार, बाबासाहेब सोनवणे, आकाश गायकवाड यांच्यासह शिक्षक शिर्के, सोनवणे, गोमलाडू, गिरणार, भालेराव, कोकदे, मोरे, बोरुडे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याणमधील मंडळाला गणपती पावला ! पोलिसांनी देखावा जप्त केला, पण न्यायालयाची सशर्त परवानगी

आधुनिक केसरी न्यूज



**कल्याण :** कल्याण परिसरातील विजय तरूण मित्र मंडळाच्या वतीने यंदा शिवसेनेतील बंडखोरी पक्षनिष्ठ यावर चलचित्र देखावा साकारला होता. मात्र, पोलिसांनी कायदा-सुव्यवस्थेचे कारण पुढे करत ३१ ऑगस्टला कारवाई करत हा देखावा जप्त केला होता. या कारवाईला विरोध करत मंडळाने मूर्तीची स्थापना न करता तसेच यापुढे उत्सव साजरा न करण्याची प्रतिज्ञा करत याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयात शुक्रवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीसाठी अप्पर पोलीस, उपायुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक न्यायालयात हजर होते. या सुनावणीत न्यायालयाने मंडळाला देखावा सादर करण्याची सशर्त परवानगी दिली. विजय मित्र मंडळाला देखाव्यातील आक्षेपार्ह दृश्य तसेच ऑडीओ क्लिप मधील आक्षेपार्ह संवाद काढून टाकण्याच्या अटीवर देखावा सादर करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
या प्रकरणाची सुनावणी गुरुवारी होणार होती. मात्र, सरकारी पक्षाचा प्रतिनिधी उपस्थित नसल्याने ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. न्यायमूर्तींनी या प्रकरणात डीसीपी, वरिष्ठ पीआय आणि इतरांना सरकारी पक्षातर्फे उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार न्यायालयाने दोन दुरुस्त्यांसह या देखाव्याला पुन्हा परवानगी दिली आहे.
देखावा वादग्रस्त का ठरला?
शिवसेना विरुद्ध एकनाथ शिंदे गटातील वादामुळे या देखाव्यावर आक्षेप घेण्यात आला होता. पक्षनिष्ठा या विषयावर चलचित्र देखावा साकारण्यात आला होता. या देखाव्यात शिवसेना म्हणून मोठा वृक्ष दाखवण्यात आला आहे. तर, या वृक्षाला फळे लागल्यानंतर ती इतर पक्ष खातात अशा आशयाचा हा देखावा होता. कल्याण पोलिसांनी ३१ तारखेला पहाटे कारवाई करत देखाव्याची सामग्री जप्त केली होती. त्यानंतर विजय मित्र मंडळाचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. मंडळातर्फे प्रत्येक वर्षी महत्वाच्या घडामोडीवर देखावा साकारला जातो. यंदाच्या देखाव्यात काहीच आक्षेपार्ह नव्हते. देखावा जप्त करण्याची कारवाई, ही हिटलरशाही आहे. या कारवाईचा निषेध म्हणून आम्ही यंदा गणेश मूर्तीची स्थापना करणार नाही, अशी भूमिका मंडळाने घेतली होती.

# सणासुदीच्या विशेष मोहिमेअंतर्गत ग्राहकांना निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सणासुदीच्या काळात बाजारपेठेत मिठाई, खवा, मावा, नमकीन ई. अन्नपदार्थांना मोठया प्रमाणात मागणी असते. या काळात दुध व दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, मिठाई इ. अन्न पदार्थामध्ये भेसळ होण्याची तसेच कमी दर्जाचे अन्न पदार्थ उत्पादन व विक्री होण्याची शक्यता असते. त्यामुळे ग्राहकांना सुरक्षित, निर्भेळ व सकस अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत याकरिता प्रशासनाने अन्न आस्थापनांच्या तपासण्या व नमुने विश्लेषणासाठी घेण्याची विशेष मोहिम हाती घेतलेली आहे.
प्रशासनातर्फे ग्राहकांना सुरक्षीत व गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ मिळण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.
प्रशासनातर्फे ग्राहकांना अन्न पदार्थ खरेदी करतांना खालील काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मिठाई, दुध व दुग्धजन्य व इतर अन्नपदार्थ खरेदी करतांना फक्त नोंदणी/परवानाधारक आस्थापनाकडुन खरेदी करावे. मिठाई, दुध व दुग्धजन्य पदार्थ ताजे व आवश्यकतेनुसार खरेदी करावे. खरेदी करतांना वापर योग्य दिनांक (Use by date) पाहुनच खरेदी करावी. उघडयावरील अन्नपदार्थांची खरेदी करु नये. माव्यापासून बनविलेल्या मिठाईचे सेवन शक्यतो 24 तासाच्या आत करावे, तसेच साठवणूक योग्य तापमानाला (फ्रिजमध्ये) करावी. मिठाईवर बुरशी आढळल्यास तसेच चव व वासामध्ये फरक जाणवल्यास ती मिठाई सेवन करु नये. ग्राहकांनी अधिक माहिती व तक्रारी करण्यासाठी प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक 1800222365 वर संपर्क करण्याचे आवाहन सह आयुक्त (अन्न) नाशिक ग.सु. परळीकर यांनी केले आहे.

# अंबाजोगाईत महावितरण विरोधात रोष

## सातत्याने वीज गायब : नियमित सोडा पण उत्सव काळातही सेवा देण्यात महावितरण अपयशी

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** शहर व शहरालगत असलेल्या परिसरात सध्या आठवडाभरापासुन मोठ्या प्रमाणात विजेचा लपंडाव सुरू आहे. परंतु नुकताच लाडक्या गणरायाचे आगमन झाले आहे. बाप्पाचे स्वागत बुधवारी उत्साहात करण्यात आले. परंतू अंबाजोगाई मधे बाप्पाला सुद्धा पहिलीच रात्र अंधारात काढावी लागली. शहरातील अनेक भागातील वीज पुरवठा रात्रभर खंडीत होता. त्यामुळे ग्राहकांसह गणेश भक्तांमधून संताप व्यक्त करण्यात आला. तसेच नियमित तर वीज पुरवठा खंडीत होतोच. परंतू सण उत्सव काळातही वीज गायब होत असल्याने महावितरणबद्दल रोष व्यक्त होत आहे.

**कार्यकारी अभियंता यांचे नियोजन नाही का लक्ष नाही....?**

कार्यकारी अभियंता वाघमारे हे लातुरहून ये-जा करतात. त्यांच्या येण्या-जाण्याचे आणि वेळेचे नियोजनच नसल्याचे कानावर पडत आहे. त्यामुळे त्यांच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांवरती धाक नसल्याचेच चित्र सध्या तरी दिसून येत आहे. उपकार्यकारी अभियंता संजय देशपांडे नुकतेच कालच्या ३० तारखेला निवृत्त झाले असून ते मुळ अंबाजोगाईचेच रहिवाशी असल्याने आणि त्यांचा जनसंपर्क दांडगा असल्याने रागावैतागेने घडणाऱ्या अनुचित प्रकार शक्यतो घडतच नव्हते. कारण संजय देशपांडे आलेल्या प्रत्येक फोनचे उत्तर तर देतच होते. परंतु तक्रारदाराचे समाधान होईल असा समाधानकारक पाठपुरावाही करत होते. आता ऐवढ्या संपर्काचा आणि संयमी अधिकारी शक्यतो मिळणे कठीण आहे. आन चुकूनहूकुन मिळालाच तर त्या अधिकाऱ्याच्या संजय देशपांडेईतका जनसंपर्क नक्कीच असणार नाही....! तेंव्हा आता कार्यकारी अभियंता यांची जबाबदारी निश्चितच वाढली असून आता तोंडावर गौरी उत्सव आल्याने त्यांना चांगलेच दक्ष राहावे लागणार आहे. अन्यथा यामागील अनुभवावरून हे नक्की की, अंबाजोगाईकरांचा संयम जेवढा वखाखण्याजोगा, तेवढाच तो ढासळल्यावर त्याची परिक्षा न घेतलेली बरी......?

तेंव्हा ऐरवीपेक्षा येणारा आठवडा अत्यंत महत्त्वपुर्ण सणासुदीचा आहे. गौरी उत्सव प्राधान्याने महिला माता-भगिणींचा तर गणेशोत्सव प्रामुख्याने तरुणाईचा असल्याने त्यांच्या उत्साह-जल्लोषात अडचण निर्माण होऊ नये. याची पुरेपूर काळजी महावितरण कार्यालयाने घेणे नितांत गरजेचे आहे. अन्यथा रोषाला सामोरे जावे लागेल याची नोंद घेणे याठिकाणी लक्षात घेऊन पुढील नियोजन करणे आवश्यक आहे.



# शालेय बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस अधीक्षक आग्रही

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ग्रामीण जिल्हयातील विविध शाळेतील मुले व मुलींची वाहतुक करणाऱ्या शालेय बस तसेच खाजगी बसमध्ये मुलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत दि.१ सप्टेंबर रोजी पोलिस अधिक्षक मनिष कलवानिया यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय मेत्रेवार, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी रमेशचंद्र खराडे, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सोफी, वाहतुक पर्यवेक्षक (म.रा.प.म.) किशोर बतिशे, विस्तार अधिकारी प.सं. औरंगाबाद धनराज कांबळे, उप व्यवस्थापक स्मार्ट सिटी बस सिध्दार्थ बनसोडे यांचेसह विविध शाळेचे मुख्याधापक, शिक्षक, प्रतिनिधी हजर होते.

यावेळी पोलीस अधीक्षक यांनी शालेय बसने प्रवास करणाऱ्या मुले व मुलींच्या सुरक्षिततेचा विषय विशेष गांर्भियाने घेत जिल्ह्यातील अशा सर्व संबधीत शाळांना मुलांची शालेय बसने प्रवास करताना परिवहन विभागाचे नियमांचे काटकोरपणे पालन करण्याबाबत सुचना देऊन पुढील मार्गदर्शक सुचनाचे व्यवस्थापन करण्याबाबत निर्देश दिले. यामध्ये स्कुल व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त मुलांची ने आण होता कामा नये. तसेच शाळेच्या मुख्याधापकांनी याबाबत नियोजन करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्हॅनमध्ये जी.पी.एस. सुविधेसह सी.सी.टी.व्ही. कॅमेरे असणे अत्यावश्यक आहे. बसवरील चालक व वाहक यांचे वेळोवेळी तपासणी करून चारित्र्य पडताळणी करूनच त्यांची नेमणुक करावी. मुलांची चढ-उतार करताना त्यांच्या देखभालीकरिता प्रत्येक बसमध्ये एक महिला अटेंन्डंट ठेवावी. बसमधील आसन व्यवस्था निट व चांगल्या दर्जाची असणे आवश्यक आहे.

शाळेने स्कुल बस समिती पालकांचे माध्यमातून स्थापन करावी व या समितीद्वारे वेळोवेळी आढावा घेऊन बसचालक हा मुलांना व मुलींना वेळेत सोडतो अगर कसे, तो व्यसनी अगर विकृत स्वभावाचा आहे का याबाबत खात्री करावी. याचप्रमाणे पालकांनी सुध्दा मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागृत राहुन काळजी घेणे आवश्यक आहे. याच प्रमाणे ज्या शाळा मुलांचे स्कुलबस करिता सुरक्षा व वाहतुक नियंमाचे पालन करणार नाहीत त्यांचे स्कुल व्हॅनचे परवाने परिवहन विभागामार्फत तपासणी करून रद्द करण्याचे सुचना सुध्दा यावेळी पोलीस अधीक्षक यांनी दिले आहे.

# महाकवी वामनदादा कर्डक यांची जयंती उत्साहात साजरी

## कडूबाई खरात यांच्या भीमगीतांनी आणली रंगत

आधुनिक केसरी न्यूज

**लासुर स्टेशन :** आपण खातो त्या भाकरीवर, होता तो बापाचा बाप माझा भीमराव आंबेडकर, माझ्या भिमानं भीमा ना माय सोन्यानं भरली ओटी, सांगा वो सांगा गाडीवाले दादा, असे एका पेक्षा एक आंबेडकरी सरस गीत गाऊन तसेच वामनदादा कर्डक यांच्या लेखनेतील गाण्याला उजाळा देत कडूबाई खरात यांनी रंगत आणली.

शाहीर, लोककवी आणि आंबेडकरी चळवळीच्या सुवर्ण कालखंडातील बिनीचे शिलेदार महाकवी वामनदादा कर्डकयांच्या 100 वी जयंती शताब्दी वर्ष निमित लासुर स्टेशन येथील संबोधी बौध्द विहार येथे वामनदादा कर्डक यांच्या लेखणीतील भीम गीत गाऊन जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी कडूबाई खरात, सामाजिक कार्यकर्ते रमेश जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरवातीला वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमीचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमानिमित्त प्रदीप पठारे, विजय मोकळे, दिनेश धडे, रेखा भारती सिद्धार्थ कांबळे, आबा अडसूळ किरण आमराव, संजय मगर, कैलास सोनावणे यांनी गीत गायन केले. तसेच जिल्ह्यातील व तालुक्यातील मान्यवर वादक, कलावतांनी या कार्यक्रमात हजेरी लावली. दरम्यान या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक वामनदादा साळवे, सुभाष थोरात, संजय कांबळे, कपिल खंडागळे, सुमित खंडागळे यांनी परिश्रम घेतले.



# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने गौरी गणपती स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदा ही गौरी गणपती स्पर्धा आयोजित केले आहे. या मध्ये स्पर्धेचे नियम आहेत. ते पुढील प्रमाणे आपण केलेली आरास 30 चा सेकंद व्हिडिओ, 1 फोटो खालील नंबरवर नोंदणी करावा.

या स्पर्धेमध्ये कोणताही हिंदु धर्मीयांचा स्पर्धक भाग घेउ शकतो. ही स्पर्धा औरंगाबाद जिल्ह्यासाठी मर्यादित आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र मिळणार आहे. सहभागी स्पर्धकापैकी 10 बक्षीस देण्यात येणार आहेत. आमचे परीक्षक जो निर्णय देतील तो सर्वमान्य असणार आहे. तसेच स्पर्धा वितरण पत्ता तसेच तारीख स्पर्धकांना त्यांनी दिलेल्या व्हाट्सअपवर कळवन्यात येणार आहे.

तरी आपापल्या गौरी - गणपतीची आरास खालील मोबाइल क्रमांकवर पाठवावी, असे आवाहन औरंगाबाद चे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे आजी माजी पदाधिकारी यांनी केले आहे. 9922526687, 7588640766 या मोबाईल नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.



# मराठवाडा शिक्षक संघाचा विविध मागण्यांसाठी 25 सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** दि.31 ऑगस्ट रोजी शहीद भगतसिंग शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था जालना या ठिकाणी मराठवाडा शिक्षक संघाच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मराठवाडा शिक्षण संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे यांनी दि.25 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी, त्यांच्यावर सातत्याने होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी धडक मोर्चाच्या नियोजनाच्या संदर्भात प्रास्ताविक केले.

यामध्ये प्रामुख्याने विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना शंभर टक्के अनुदान मिळालेच पाहिजे., सर्वांना जुनी पेन्शन मिळालीच पाहिजे., शिक्षकांची वेठबिगारी थांबली पाहिजे., शिक्षकांना दिली जाणारी अशैक्षणिक कामे थांबली पाहिजेत., सर्वांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी देण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातून शिबीर आयोजित केले गेले पाहिजे., शिक्षकांना अश्लील भाषेत शिव्या घालणाऱ्या आमदारावर कारवाई झालीच पाहिजे., सर्व शिक्षकांना १०, २०, ३० आश्वासित योजनालागू झालीच पाहिजे., आमचे गुरुजी अंतर्गत शिक्षकांचा फोटो वर्गात लावण्याचा जीआर रद्द झालाच पाहिजे या व इतर अनेक मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा च्या माध्यमातून शासनापर्यंत या मागण्या पोहोचवल्या जाव्यात. हा प्रमुख हेतू यामागे आहे.

बैठकीसाठी केंद्रीय कार्यकारीणी उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, मार्गदर्शक डॉ. मारोती तेगमपुरे, डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, बनसोडे, सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, जिल्हा सचिव संजय येळवंते, जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, प्रसिद्ध प्रमुख हकीम पटेल, गणेश मेहत्रे, इप्पर, आवारे, प्रद्युम्न काकड हे शिक्षक बांधव बैठकीसाठी उपस्थित होते.






# विघ्नहर्ता गणेश मंदिर, एन-३

आधुनिक केसरी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

औरंगाबादच्या अतिशय उच्चभ्रू लोकांचा परिसर एन-३ , सिडको. अशा परिसरात असणारे अखीव रेखीव असे विघ्नहर्ता गणेश मंदिर. सिडको एन-३ मधील हे गणेश मंदिर आज हजारो भक्त जणांचे श्रद्धास्थान झालेले आहे. विघ्नहर्ताच्या या मंदिरात आपण प्रवेश करतो. तोच बहरलेली हिरवीगार वसुंधरा दोरी दोन्ही करकमल्याने येणाऱ्या भक्तगणांच्या स्वागतासाठी उभी आहे असा भास होऊन जातो. हिरवीगार लॉन वरील वाऱ्याबरोबर डोलणारी झाडे साऱ्यांच मन प्रसन्न करून टाकतात. मंदिरात प्रवेश करीत असताना डाव्या बाजूस साईचे सुंदर मंदिर तर उजव्या बाजूस विठ्ठल रखुमाईचे आणि महादेवाचे मंदिर आहे. गणेश मंदिराच्या मागे शीतला देवीचा छोटसं पण सुंदर मंदिर आहे.

सिडको एन् -३ परिसरात सार्वजनिक गणेश मंडळाची सुरुवात श्रीकृष्ण चिंचवडकर यांनी 1987 मध्ये केली. मात्र त्यानंतर विघ्नहर्ता चारिटेबल



अँड कल्चरल ट्रस्टची स्थापना करण्यात आली. परिसरातील भक्तांच्या अनमोल सहकार्यातून ऑगस्ट 1989 मध्ये गणपतीची ही अत्यंत सुबक सुंदर अखंड संगमरवरातील मूर्ती आणून तिची प्रतिष्ठापना करण्यात आली. सर्वांग सुंदर दिसणारी ही मूर्ती तीन फूट उंचीची आहे. हे मंदिर वीस फूट उंचीचे असून षटकोनी आकाराचे आहे. बाजूलाच 21 ऑक्टोबर 2001 रोजी त्यावेळचे आमदार राजेंद्र दर्डा त्यांच्या स्थानिक विकास निधीतून जवाहर सभागृह बांधण्यात आलेले आहे. संपूर्ण वर्षभर या सभागृहात धार्मिक अध्यात्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. विघ्नहर्ता मंदिरात सकाळी व रात्री सात वाजता नेते नियमाने पूजा आरती होत असते. मंदिरात गणेशोत्सवाच्या शिवाय दत्त जयंती, रामनवमी, आषाढी एकादशी, महाशिवरात्र, गणेश जयंती, अंगारिका चतुर्थी, दसरा, दिवाळी असे सणही मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

केवळ धार्मिक कार्यक्रमात च मंदिराच्या वयातील आयोजन केलं जातं असं नाही सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून हे मंदिर गरजू गरीब विद्यार्थ्यांना मदत करत असते. वैचारिक व्याख्यानांचेही आयोजन या मंदिरात केले जाते.

विघ्नहर्ता गणेश मंदिरात नित्यनेमाने हजारो भक्तगण येत असतात. निसर्गाने बहरलेल्या वनश्रीत असणारे हे गणपतीचे मंदिर तितकेच स्वच्छ आणि सुंदर आहे. या मंदिरातील गणेशाची अप्रतिम सौंदर्यपूर्ण मूर्ती पाहून भाविक भारावून जातात.. घंटांचे निनाद.. अथर्वशीर्षाचा जयघोष.. अशा वातावरणात मंदिरातील त्या गणेशाची मूर्तीच्या शांत आणि सुंदर प्रसन्न.. भावपूर्ण दर्शनाने सारे भक्त सुखवून जातात.. भारावून जातात.. एका आत्मिक समाधानाने त्यांची पावलं आपल्या घराकडे वळतात हे बाकी खरं..

# विद्यार्थी वाढले, शिक्षक घटले, गंगापूर जि.प. उर्दू शाळेतील चित्र गंभीर

## जिल्हा परिषद उर्दू शाळेला शिक्षक देण्याची अलिम चाऊस यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेत उर्दु शिक्षकांच्या तिन जागा रिक्त असल्याने मुलांचे शैक्षणीक नुकसान होत आहे. येथील सामाजिक कार्यकर्ता व पत्रकार अलिम ईसा चाऊस स्वतः यांनी शिक्षणधिकारी व जिल्हा परिषद औरंगाबाद यांना व निवेदन देण्यात आले. याबाबत 15 दिवसाच्या आत जर उर्दु माध्यमाचे शिक्षक शाळेला न दिल्यास औरंगाबाद जिल्हा परिषद येथे लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल.

गंगापूर जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळेत घडला आहे. या शाळेत सध्या 125 विद्यार्थी शिकत असून या शाळेला केवळ तीन शिक्षक आहे. संबंधित तीन शिक्षक मागील दोन ते तीन वर्षांपासून इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. काही शिक्षकांची बदली केल्यामुळे संपूर्ण शाळेला शिकवण्याची जबाबदारी केवळ तीन शिक्षकांवर आली आहे. या शाळेमध्ये सद्या शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे इयत्ता ५ वी व ८ वी या दोन्ही वर्गाचे विद्यार्थी एकाच हॉल मध्ये बसतात. तसेच इयत्ता ६ वी व ७ वी चे विद्यार्थी एकाच हॉल मध्ये बसतात तर ९ वी व १० वी चे विद्यार्थी एकाच हॉल मध्ये बसतात त्यामुळे कोणता विद्यार्थी कोणत्या इयत्तेचे शिक्षण घेत आहे. हेच समजत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारमय होत आहे.

त्यामुळे कोणता विद्यार्थी कोणत्या इयत्तेचे शिक्षण घेत आहे.



हेच समजत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणीक भविष्य अंधारमय होत आहे. त्यांच्या अभ्यासावर देखील परिनाम होत आहे. या शाळेमध्ये उर्दु माध्यमाचे शिक्षकच नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होत आहे. या बाबत वेळोवेळी कल्पना देवून सूध्दा टाळाटाळ होत असल्याने 15 दिवसाच्या आत जर उर्दु माध्यमाचे शिक्षक शाळेला न दिल्यास औरंगाबाद जिल्हा परिषद येथे लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ता व पत्रकार अलिम ईसा चाऊस यांनी खासदार इम्तियाज जलील, आमदार प्रशांत बंब, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, शिक्षक उपमहासंचालक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी औरंगाबाद यांना या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

**लवकरच मिळणार उर्दू शिक्षक**

शिक्षण अधिकारी जयश्री चव्हाण यांनी सांगितले आहे की आठ ते दहा दिवसाच्या आत गंगापूर जिल्हा परिषद शाळा चे उर्दू शिक्षक लवकरच देण्यात येईल अशी माहिती देण्यात आली.



सृष्टी हॉस्पिटल येथे विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका रेणुकादास वैद्य यांच्या हस्ते श्रीं ची आरती करण्यात आली. यावेळी डॉ.संजय पगारे, डॉ.निमिष पगारे, रमेश काथार, संदीप कसबेकर, राम केकान, राज निळ, संदीप अहिरे, पियुष कोयाळकर, बंटी कचकुरे आदींची उपस्थिती होती.




# पोलीस अधीक्षक अरविंद चावरीया यांच्या प्रमुख उपस्थितीत जळगाव जामोद येथे शांतता कमिटीची सभा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** १ सप्टेंबर रोजी पोलीस अधीक्षक अरविंद चावरिया यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जळगाव जामोद शहरातील सांस्कृतिक भवन येथे आगामी सर्व सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची सभा संपन्न झाली. शांतता सभेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार डॉ. संजय कुटे होते. तर प्रमुख उपस्थित होते जिल्हा पोलीस अधीक्षक अरविंद चावरिया, अप्पर पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, पोलीस उपविभागीय अधिकारी अभिनव त्यागी, जळगाव जामोदच्या उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार शितल सोलाट, डीवायएसपी मलकापूर खोडे, जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुनील अंबुलकर, संग्रामपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार उलेमाले, सोनाळा पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुठ्ठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर भास्कर, चौधरी साहेब यांच्यासह सर्व पोलीस कर्मचारी, पत्रकार बांधव गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष व सदस्य, सरपंच, पोलीस पाटील यांच्यासह व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अजय वानखडे, आर.पी.आय (गवई) गटाचे युवा जिल्हा अध्यक्ष प्रशांत तायडे, अब्दुल गफार, खलीहूल रहेमान, संतोष टाकळकर व संग्रामपूर तालुक्यातील गणेश मंडळाचे अध्यक्ष, पोलीस पाटील यावेळी उपस्थित होते. यावेळी शांतता सभेला मार्गदर्शन करतांना जिल्हा पोलीस अधिक्षक अरविंद चावरीया यांनी सांगितले की, यावर्षी गणेश उत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करायचा आहे. त्या दृष्टीने शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असून सर्वांनी सहकार्य करणे गरजेचे आहे तसेच हा गणेश उत्सव यावर्षी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षात संपन्न होत असून ही बाब आपण सर्वांसाठी खूप महत्त्वाची आहे. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, गणेश मंडळांनी या काळामध्ये विविध समाज उपयोगी तसेच नागरिकांना बेरोजगारांना उपयोग होईल अशा कार्यक्रमाचे आयोजित करावे. ज्याही गणेश उत्सव मंडळाचा उपक्रम सर्वात चांगला राहील त्या गणेशोत्सव मंडळास पोलीस विभागाच्या वतीने तीन व उत्तेजनार्थ दोन बक्षीस देण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक अरविंद चावरीया यांनी सांगितले.

# घाणेगाव तांडा आश्रम शाळा येथे शिक्षक आ. वसंत काळे यांची सदिच्छा भेट

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील घाणेगाव तांडा आश्रम शाळेमध्ये शिक्षक आमदार वसंतराव काळे यांची शाळेतील शिक्षकांना मार्गदर्शन करताना शाळेतील समस्या आणि अडचण शाळेत लागणारे साहित्य वेळेवर मिळतात की नाही आणि शिक्षकांना वेळोवेळी वेळेवर पगार तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन वेळ करण्यात यावे शिक्षकांचे समस्या जाणून घेऊन शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की शाळेतील इमारती किंवा विद्यार्थ्यांचे साहित्य शाळा शाळेला लागणारे ग्रंथालयाचे पुस्तके देण्यात येईल व शिक्षकांना आमच्याकडून जेवढी मदत होईल तेवढी शासनामार्फत शाळांना मिळून देणार, असे आश्वासने देण्यात आले. मी शिक्षक आमदार वसंतराव काळे सर्व शिक्षकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असे बोलताना सांगितले. यावेळी उपस्थित घाणेगाव आश्रम शाळा माध्यमिक



मुख्याध्यापक आर.व्ही. चव्हाण, प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापक पी. टी. आहेर, शिक्षक संजय पाटील एम.ए. पाटील, कवी, अर्जुन, पवार, एम.लवांडे, जीवन, राष्ट्रवादी काँग्रेस युवक तालुकाध्यक्ष आरिफ लोकमान, तालीप भाई, गजानन चव्हाण, रिंकू भाई, आनंद चव्हाण, सुनील चव्हाण हे सर्वांनी शिक्षक आमदार वसंतराव काळे यांचा सत्कार करण्यात आला.

# टिटवी-पळसखेडा येथे "एक दिवस माझ्या बळीराजासाठी" उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी-पळसखेडा येथे सोयगाव कृषी विभागाचे वतीने तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ सोयगाव यांनी पळसखेडा येथे येऊन एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत पळसखेडा येथे कृषी विभागाकडून दि.१/९/२२ गुरुवार रोजी संध्याकाळी सात वाजता मराठवाडा व विदर्भ विभागातील शेतकऱ्यांच्या नैराश्य व त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्या यावर प्रभावीपणे उपाययोजना करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत तसेच बळीराजा सुखाचे दिवस यावेत याकरिता शेतकऱ्यांना मार्गदर्शन "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी" उपक्रम माजी सभापती सांडू तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

यावेळी तालुका कृषी अधिकारी कृषी सहाय्यक एम.आर.भोळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना असे म्हटले की, गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, कीटकनाशके हाताळताना शेतकऱ्यांनी




घ्यावयाची काळजी इत्यादी बाबत सखोल असे मार्गदर्शन केले. आणि कृषी आत्मा पर्यवेक्षक ए.एस.महाजन, कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख, ऐ.जे.पाटील, यांनी पळसखेडा गावातील शेत शिवारातील पिंकाची पाहणी केली. शेताच्या वाहत्या पाण्यातून जाऊन शेताच्या बांधावर वाट काढून शेतकऱ्यांशी संवाद साधून चर्चा केली. अशा प्रकारे सोयगाव कृषी विभागाने सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी माजी सभापती सांडू तडवी, सरपंचपती भागवत जाधव, उपसरपंच लहू प्रेमसिंग राठोड, मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिलावर्ग व शेतकरी यांच्याउपस्थित "माझा एक दिवस बळीराजासाठी" उपक्रम सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कार्यक्रम पार पडला.

# अवैधरित्या देशी दारूची दुचाकीवरुन वाहतूक करणारे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** आज दि.२ रोजी पैठण तालुक्यातील बिडकिन पोलिस ठाणे हद्दीतील दोन वेगवेगळ्या ठिकाणी दुचाकीवरून देशी दारू चे बॉक्स वाहतूक करणाऱ्यांवर कार्यवाही करत दोन जण ताब्यात घेण्यात आले आहे. यावेळी रांजणगाव खुरी येथील रोडवरून वाहतूक करत असताना व पोरगाव येथे जात असताना आरोपी लक्ष्मण बालाजी पांचाळ, वय.२२ वर्षे, रा.चितेगाव, ता.पैठण आणि आरोपी साईनाथ रामनाथ रांजणे, वय.२५ वर्षे, रा.चितेगाव, पैठण अशा दोघांवर कार्यवाही करत ताब्यात घेण्यात आले आहे.

यावेळी रांजणगाव खुरी येथील छापेत २४,०००/- रु ची देशी दारू भिंगरी संत्रा, काचेच्या २४० सिलबंद बाटल्या व टिव्हीएस कंपनीची स्कुटी जिची किंमत ४२,०००/- रु असा एकूण ६६,०००/- रुपयांचा



मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तर पोरगाव येथील मारलेल्या छापेत ९८०० रु किंमतीचा देशी दारू भिंगरी संत्रा च्या एकुण ९६ काचेच्या बाटल्या व वापरती स्कुटी जिची किंमत ४०,०००/- असा एकूण ४९,८०० रु किंमतीची माल जप्त करत असा दोन्ही मूद्देमाल मिळुन एकुण १,१५,८०० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# अण्णाभाऊ यांच्या एकंदरीत समाजकार्याची दखल घेऊन भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान द्यावा : देशमुख

## राडी येथे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** अंबाजोगाईपासून अगदी जवळच असलेल्या राडी गावी लोकशाहीर सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंती निमित्त कार्यक्रमात अण्णाभाऊ यांच्या एकंदरीत समाजकार्याची दखल घेऊन केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान द्यावा अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली.

**राजेसाहेब देशमुखांची चौफेर फटकेबाजी**

अध्यक्षीय समारोप करताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख म्हणाले की, दिवंगत लोकशाहीर सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या समग्र कार्याची दखल घेऊन केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान द्यावा, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी याबाबत केंद्राकडे शिफारस करावी, अशी मागणीही देशमुख यांनी केली. राडी येथे दरवर्षीच जयंतीनिमित्त विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, तरूण पिढीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्या विचार व कार्याचा प्रचार आणि प्रसार करावा, नागरिकांनी या विचार प्रबोधन पर्वात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, 'महापुरुषांच्या कार्याचे उत्सव होत राहिल्यानेच गाव कुसाबाहेर राहणाऱ्या समाजापर्यंत विचार पोहोचले. दोन पिढ्या या विचारांनी प्रेरित होऊन प्रगतीची वाट चालू लागल्या आहेत. सुशिक्षितांचे प्रमाण अण्णाभाऊ यांच्या सारख्या महापुरूषांच्या विचारांच्या प्रबोधनामुळे वाढले. अण्णाभाऊंच्या विचारांचे तरूणांनी मंथन करावे आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गाने देशसेवा करावी,' असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी केले.

काँग्रेसचे दिवंगत नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांनी महाराष्ट्रात वंचित बहुजन समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्याय विभागाला मोठा निधी उपलब्ध करून दिला. तत्कालीन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री चंद्रकांतजी हंडोरे यांच्या माध्यमातून सामाजिक अभिसरणाचा प्रयोग केला, काँग्रेस पक्षाचा मुख्य जनाधार हा आदिवासी, मुस्लिम, वंचित आणि बहुजन हा आठरा पगड जातीधर्म असलेला समाज राहिलेला आहे. या सर्वच समाजाला सारखा न्याय देण्याची भूमिका व कार्य काँग्रेस पक्षाने सातत्याने केले आहे. २००४ साली दिवंगत विलासरावजी देशमुख यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री असणारे हंडोरे यांनी सामाजिक न्याय मंत्री म्हणून त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले होते. त्यांच्या या सर्वच निर्णयांना काँग्रेस पक्षाने त्यावेळेस भक्कम पाठबळ दिले होते, देशमुख मंत्रिमंडळात एक आक्रमक मंत्री म्हणून हंडोरे यांची चर्चा असायची. काँग्रेस पक्षाने नेहमीच समाजातील शेवटच्या घटकांसाठी लोकहिताची विकास कामे करून सर्वसामान्य माणूस सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगतिपथावर गेला पाहीजे याच विधायक भूमिकेतून आजही काम करीत असल्याचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले. सध्या देखिल राष्ट्रीय नेत्या खासदार सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, खा.रजनीताई पाटील, महाराष्ट्र प्रभारी एच.के.पाटील, प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले, आ.धीरज देशमुख, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वात बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष हा समाजातील शेवटच्या घटकांसाठी काम करीत आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख हे होते. तर यावेळेस विचारमंचावर सरपंच दत्तात्रय गंगणे, उपसरपंच अरूण बनसोडे, माजी सरपंच सतिष गंगणे, ग्रामपंचायत सदस्य शेख जुबेर, ग्रामपंचायत सदस्य कौसाबाई बनसोडे, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश गंगणे, धनराज कोळगिरे, बाळासाहेब जगताप, आकाश सोनवणे, सुरेश वाघमारे, हरिभाऊ वाघमारे, आयोजक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सतिष वाघमारे, सुरज वाघमारे, विलास वाघमारे, पिंटू वाघमारे,अशोक वाघमारे, लहू वाघमारे, खंडू लोंढे, मारूती वाघमारे, शेषेराव वाघमारे, सखाराम वाघमारे आदींसह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पंचरंगी ध्वजारोहण करून उपस्थित मान्यवरांकडून जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यासह सर्वच महापुरूषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळेस सामाजिक कार्यकर्ते आर.डी.जोगदंड यांनी "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात सत्यशोधक अण्णा भाऊंचे योगदान" या विषयावर आपले मौलिक विचार व्यक्त केले. प्रारंभी उपसरपंच अरूण बनसोडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरज वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार आकाश सोनवणे यांनी मानले.

**राजेसाहेबांची मागणी रास्त : परंतु ती फार अगोदरपासून का नाही याची खंत वाटते : अच्युतबापु गंगणे**

काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केलेली मागणी अगदी रास्त आहे. कारण आण्णाभाऊंचे समाजकार्य, त्यांचा त्याग पाहता ते नक्कीच भारतरत्न पुरस्कारासाठी पात्र आहेत. आणि तो द्यावा, दिला पाहिजे. परंतु याची मागणी राजेसाहेब देशमुख ईतक्या उशीरा करतायेत. आणि ते करताना त्यांच्या मागणीत ईच्छेपेक्षा राजकीय इर्षा पाहून मात्र खंत वाटली की, ऐवढ्या मोठ्या साहित्यिक तथा समाजसुधारक महापुरुषांच्यासाठी भारतरत्न मागतानाही राजकारण...?? ही त्यांची चुक नाही. ते ज्या पक्षात काम करतात. तिथली हीच संस्कृती असावी कदाचित......??? म्हणून ६०-६५ वर्षांपासून काँग्रेस सत्तेत असताना जे शहाणपण काँग्रेसला सुचायला हवे होते ते आता त्यांच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांना सुचत आहे. हे पण ऐक नवलच......???? माझा राजेसाहेबांना सवाल एवढाच आहे की, याअगोदर आपण कधीही संदर्भीय मागणी केली नाही. साधी सुचवलीही नाही. आणि आता उशीरा सुचलेल शहाणपण योग्य आहे. फक्त उग्रवास येतोय तो गलिच्छ राजकारणाचा अशा स्पष्ट खडेचोट शब्दात भाजपचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अच्युत (बापु) गंगणे यांनी दै.आधुनिक केसरीशी बोलताना आपली प्रतिक्रिया दिली.

**मागणीतील राजकीय उद्देश सोडता बाकी भाषण जोरदार**

तालुक्यातील राडी येथे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राजेसाहेब देशमुख बोलत होते.त्यांच्या मागणीतील राजकीय उद्देश सोडला तर बाकी भाषण जोरदारच झाले. कारण ते ऐक पट्टीतील वक्ते असुन ग्रामीण भागात त्यांच्या भाषणबाजीचा ऐक ठराविक चाहता वर्ग कायम असल्याचेही यावेळी भाजपाचे अच्युत गंगणे बोलले.

# "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी" उपक्रमास सोयगाव तालुक्यात प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** राज्यात दि.१ सप्टेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत मराठवाडा व विदर्भ विभागातील शेतकऱ्यांच्या नैराश्य व त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्या यावर प्रभावीपणे उपाययोजना करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत तसेच बळीराजाला सुखाचे दिवस यावेत याकरिता "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी" या उपक्रमाची सुरुवात प्रत्येक तालुक्यात करण्यात आली आहे. त्यानुसार सोयगाव तालुक्यात आज रोजी मौजे पळसखेडा (सा) येथे कृषी विभाग व आत्मा यंत्रणा यांचे मार्फत विविध घटकांचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या कार्यक्रमात प्रामुख्याने महसूल, जलसंधारण, ग्रामविकास, वीज खात्याच्या संदर्भातील अडचणी याबाबत चर्चा, पतपुरवठा व सामाजिक सुरक्षा, तंत्रज्ञान प्रसार, पिक वैविधिकरण तसेच शेतकऱ्यांना मार्केटशी जोडणे या विषयी आवश्यक त्या उपाययोजना याविषयी सरपंच व गावातील प्रगतशील शेतकरी तसेच मजी सभापती यांचेशी चर्चा करून गावचा प्रगतीचा आलेख सुधारण्याविषयी नियोजन करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमात एस.जी. वाघ तालुका कृषि अधिकारी सोयगाव प्रत्यक्ष बांधावर जाऊन कापूस व सोयाबीन पिकाविषयी माहिती देऊन कृषि विविध योजनांचा लाभ घेण्याविषयी मार्गदर्शन केले. एच.बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक यांनी महाडीबीटी, पिकविमा, ई पिक पहाणी याविषयी मार्गदर्शन केले. ए.जे. पाटील कृषि पर्यवेक्षक फर्दापूर यांनी कापूस व सोयबिन पिकावरील किड व रोग याविषयी करावयाच्या उपाययोजना याविषयी माहिती दिली. एम.आर. भोळे कृषि सहाय्यक यांनी पोक्रा योजना तसेच भोळे हे स्वतः भारतीय सेनेत सेवा देऊन आलेले असल्याने त्यांनी गावातील तरुण मुलांसाठी अग्निवीर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करून याकामी योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले तसेच ए.एस. महाजन बी.टी.एम. सोयगाव यांनी शेतकरी गट व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून...

आधुनिक केसरी

**२. काहीतरी वेगळं करण्याचा प्लॅन करा :** काही तरी वेगळं याचा अर्थ असा
आहे की लग्नापर्यंतच्या आयुष्यात जे रुटीन लाईफ तुम्ही जगत आलात त्यापेक्षा काही वेगळं करण्याचा प्रयत्न करा जे तुमच्यासाठी नवीन असेल. स्विमिंग करत नसाल तर ते करा, एकाच ताटात खाल्ल नसेल तर ते करुन पाहा, एकच आईस्क्रीम दोघांत खाऊन पाहा, जे कपडे तुम्ही नेहमी परिधान करता त्यापेक्षा काही वेगळे ड्रेसेस घालून पाहा, सिनेमा, नाटक, मनोरंजनाचे कार्यक्रम असतील तर ते अटेंड करा. या सर्व गोष्टी मुळे तुमच्यातील अनोळखीपणा संपेल आणि तुम्ही एकमेकांच्या अधिक जवळ याल.

**३. प्रसन्न वातावरण :** ज्या हॉटेल रुममध्ये तुम्ही वास्तव्य केलं असेल त्या
रुममधील वातावरण कसं आहे ? तिथे तुम्हाला आवश्यक अशा सुख सोई आहेत का? तिथे आवश्यक अशी शांतता आणि एकांत आहे का ? अंथरुणं तसेच पांघरुण स्वच्छ आणि पांढरीशुभ्र असावीत त्यामुळे मन आणखी प्रसन्न होईल आणि प्रफुल्लित बनेल.

**४. ईट अन्ड ड्रिंक :** एखाद्या दिवशी कॅण्डल लाईट डिनरचा प्लॅन करा. आवडीचे पदार्थ, ज्यूस, कॉकटेल असं मागवून ते अगदी शांतपणे, गप्पा मारत, एकमेकांना भरवत असं एंजॉय करा. निवांतमपणे टी.व्ही., मोबाईल या गोष्टी बाजूला ठेवून पूर्ण वेळ एकमेंकाना द्या म्हणजे त्या कॅन्डल लाईट डिनरची मजा दोघांनाही घेता येईल.

**५. वाद-भांडण टाळा :** अनेक वेळा जर ती दोघं एकमेकांसाठी अनोळखी असतील तर स्वभाव नीट माहीत नसतात. सवयी हा प्रत्येकाच्या खासगी आयुष्याचा एक भाग असतो त्या नीटशा माहीत झालेल्या नसतात अशावेळी एखादी न पटणारी बाब घडू शकते. अशावेळी समोरच्या व्यक्तीसोबत वाद किंवा भांडण न करता तीला किंवा त्याला आपली भूमिका, आपलं म्हणणं पटवून देण्याचा प्रयत्न करा. एकमेकांची मनं सांभाळा. आपल्या वागण्यामुळे समोरची व्यक्ती दुःखी होणार नाही, दुखावली जाणार नाही याची काळजी घ्या. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# शेतातून 38 प्लास्टिकच्या नळ्यांचे बंडल चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकिन नजिकच्या फारोळा येथील शेतकरी यांच्या प्लास्टिक नळ्यांचे ३८ बंडल चोरी गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

बिडकीन-औरंगाबाद येथे स्थायिक असलेले संजय अंबादास धरपळे रा.अमृत नगर औरंगाबाद यांच्या फारोळा येथील शेतातून 38 प्लास्टिक नळयाचे बंडल अज्ञात चोरट्याने लांबविले असुन एकूण 72 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याबाबत चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात जुनेद जाकीर सय्यद वय २० वर्षे व जुबेर जाकिर सय्यद वय २३ वर्षे, रा.ह.मु शेकटा रोड, बिडकिन असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दोन्ही आरोपींकडुन तपासादरम्यान ६ बंडल चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. काल उशिरा बिडकीन पोलीस ठाण्यात कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करत दोन्ही आरोपी ताब्यात घेऊन आज पैठण न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. सदरील घटनेचा तपास सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी योगेश नाडे हे करित आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in